


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड




www.surajyadigital.com | शनिवार दि. २६ नोव्हेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ६० वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# पंढरपूरचा कॉरिडॉर रद्द करा, अन्यथा कर्नाटकात समावेश करा

## ▪आषाढीच्या शासकीय महापूजेचे बोम्मईंना निमंत्रण
## ▪तीर्थक्षेत्र पंढरपूर बचाव समितीचा इशारा

सुराज्य/सोलापूर

**वारंवार एकाच परिसरात विकासाच्या नावाखाली रुंदीकरणाचा घाट घातला जात असेल तर तीर्थक्षेत्र पंढरपूरचा कर्नाटक राज्यात समावेश करावा अशी संतप्त मागणी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी केली असून पंढरपूर कॉरिडॉर रद्द न केल्यास पुढील वर्षी आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेस कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांना निमंत्रण देणार असल्याचा इशारा राज्य सरकारला दिला आहे. मात्र या मागणीला मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी कडाडून विरोध केला आहे. ज्यांना कर्नाटकात जायचे आहे त्यांनी जरूर जावे, आम्ही हा लढा लढण्यासाठी सक्षम आहोत असे त्यांनी जाहीर केले आहे.**

पंढरपूर कॉरिडॉरला विरोध करण्यासाठी तीर्थक्षेत्र पंढरपूर बचाव समितीच्या वतीने शुक्रवारी पश्चिमद्वार येथे महिला व पुरुषांनी ठिय्या आंदोलन केले. यावेळी कॉरिडॉर रद्द करण्याची मागणी करण्यात आली.यावेळी स्थानिकांनी सकाळपासून भजन आंदोलन सुरू केले होते. विविध पक्ष, संघटनाचे पदाधिकारी यांनी आंदोलनात सहभागी होऊन पाठिंबा दर्शविला. यावेळी बोलताना बचाव समितीचे प्रवक्ते रामकृष्ण महाराज वीर यांनी, पंढरपूर कॉरिडॉरला आमचा विरोध नसून हा आराखडा मंदिर परिसरात करू नये अशी मागणी असल्याचे सांगितले. यापूर्वी या परिसरात तीनवेळा विकासकामांसाठी व रुंदीकरणासाठी स्थानिकांची घरे ताब्यात घेतली आहेत. नव्या कॉरिडॉरमध्ये देखील अनेक प्राचीन मठ, मंदिरे बाधित होणार आहेत. यामुळे पंढरपूर कॉरिडॉर चंद्रभागेचे वाळवंट, ६५ एकर परिसर अथवा नदीवर मोठा पूल उभारून करावा अशी मागणी केली. यावेळी तहसीलदार सुशील बेल्हेकर यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन निवेदन स्वीकारले. या आंदोलनात बचाव समितीचे ऋषिकेश उत्पात, शैलेश बडवे, भागवत बडवे, कौस्तुभ गुंडेवार, डॉ.प्राजक्ता बेणारे, राजेंद्र वट्टमवार, गणेश लंके, श्रीकांत हरिदास, गणेश महाजन यांच्यासह युवक नेते प्रणव परिचारक, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण शिरसट, सतीश मुळे, माजी नगरसेवक इब्राहिम बोहरी, अनिल अभंगराव, विक्रम शिरसट, राजू सर्वगोड, विवेक परदेशी, रा.पां.कटेकर, मनसेचे संतोष कवडे, गणेश पिंपळनेरकर, राहुल परचंडे, किशोर खंडागळे, हरी गोमासे आदी सहभागी झाले होते.




### भाजपच्या पदाधिकाऱ्यांचा राजीनामे देण्याचा इशारा

महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेल्या कॉरिडॉर हा रद्द करण्यात यावा, यासाठी पंढरपुरात आंदोलन करण्यात येत आहे. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी या कॉरिडॉरसाठी विशेष प्रयत्न केले आहेत. मात्र आमची जरी सत्ता असली तरी हा कॉरिडॉर रद्द झाला पाहिजे. झाला नाही तर शहर आणि तालुक्याचे भाजपचे पदाधिकारी राजीनामा देणार असल्याचे पंढरपूर भाजपचे अध्यक्ष विक्रम शिरसाट यांनी सांगितले.

### मुख्यमंत्र्यांचा निरोप घेऊन जिल्हाधिकारी आले

दरम्यान कॉरिडॉर रद्द नाही झाल्यास पंढरपूरला कर्नाटकमध्ये सामील करा, अशी मागणी समोर आली असून या मागणीची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तात्काळ दखल घेऊन स्थानिकांना, व्यापाऱ्यांना, वारकरी संप्रदायाला विश्वासात घेऊनच कॉरिडॉरला मान्यता देण्यात येईल, असे जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले. जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी तात्काळ पंढरपूरला येऊन मंदिर परिसर बचाव समितीच्या सदस्यांना भेटून मुख्यमंत्र्यांचा निरोप पोचवला आहे.

### पंढरपूर कर्नाटकला जोडण्याच्या मागणीला मनसेचा विरोध

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने प्रस्तावित कॉरिडॉरला पहिल्यापासून विरोध दर्शविला आहे. मात्र आज झालेल्या आंदोलनादरम्यान कॉरिडॉर रद्द करा अन्यथा आम्हाला कर्नाटकाला जोडा अशी मागणी पुढे आली आहे. या मागणीला मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी कडाडून विरोध केला आहे. कॉरिडॉर रद्द करण्याची धमक आमच्या मध्ये आहे. आपण हा लढा आणखीन ताकतीने लढू या. मात्र ज्यांना कर्नाटकामध्ये जायचे आहे त्यांनी खुशाल जावे, असा इशारा मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी दिला आहे.

### विठुराया कर्नाटकाचा....

आदित्य फत्तेपूरकर यांनी, कॉरिडॉरबाबत चर्चा सुरू असताना प्रशासकीय पातळीवर मात्र याचे वेगाने काम सुरू असल्याने आमचा विश्वासघात केला जात असल्याचा आरोप केला. आमच्यावर वारंवार अन्याय होत असेल तर तीर्थक्षेत्र पंढरपूरचा समावेश कर्नाटकात राज्यात केला जावा, अशी आम्ही मागणी करू, असा इशारा दिला. विठुराया मूळचा कर्नाटकातील असून त्याचे हे गाव कर्नाटकात समाविष्ट करण्याची मागणी करणार असल्याचे सांगितले. तसेच पुढील वर्षी आषाढीस कर्नाटक राज्याच्या मुख्यमंत्र्यांना आमंत्रित करणार असल्याचा इशारा दिला.

---

## नोकरी मिळत नसल्याने इंजिनिअर तरुणाची आत्महत्या

**सोलापूर :** अभियांत्रिकेचे शिक्षण घेऊन देखील नोकरी मिळत नसल्याने निराश झालेल्या एका २३ वर्षीय तरुणाने विहिरींत उडी टाकून आत्महत्या केली. ही घटना कुंभारी (ता.दक्षिण सोलापूर) येथील आसाराम बापू मठाच्या पाठीमागील विहिरींत शुक्रवारी दुपारी उघडकीस आली.

ईश्वर रमेश गुंटूरक (वय २३ रा.जुने विडी घरकुल अ विभाग) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. बुधवारी दुपारी घरातून गेला होता. याची माहिती मिळाल्यानंतर वळसंगचे पोलीस आणी अग्निशामकच्या पथकाने संबंधित विहिरींतील पाण्यात शोध घेतला.पाणी जास्त असल्याने मृतदेह आढळून आला नव्हता. शुक्रवारी त्याचा मृतदेह विहिरींत तरंगताना आढळून आला. मयत ईश्वर गुंटूर याचे शिक्षण बी.ई. झालेले आहे. त्याच्या पश्चात आई, वडील, भाऊ आणि बहीण असा परिवार आहे. त्याचे वडील लुम कारखान्यात जॉबर म्हणून काम करतात. घटनेची नोंद वळसंग पोलिसात झाली. सहाय्यक फौजदार दासरी पुढील तपास करीत आहेत.

## कुत्रा आडवा आल्याने
## नातवाच्या दुचाकीवरून पडलेल्या आजोबाचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

नातवाच्या दुचाकीवरून जाताना कुत्रा आडवा आल्याने घसरून खाली पडून जखमी झालेले दगडू बंडा जाधव (वय८३ रा.देगाव ता.उत्तर सोलापूर) हे शासकीय रुग्णालयात उपचार घेताना शुक्रवारी मरण पावले. १६ नोव्हेंबर रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास बेलाटी येथील शेतातून आपल्या घराकडे नातवाच्या दुचाकी पाठीमागून निघाले होते.

देशमुख वस्तीजवळ कुत्रा आडवा आल्याने ते घसरून खाली पडले होते. त्यांना खाजगी रुग्णालयात प्राथमिक उपचार करून शासकीय रुग्णालयात आकाश जाधव (नातू) यांनी दाखल केले होते. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## भिशीच्या सभासदांना आमिष दाखवून पावणेदोन कोटींना फसवले

**सोलापूर :** २७६ भिशी सभासदांना भरलेल्या मुद्दल रकमेवर एक टक्का वाढीव देण्याचे आम्हीच दाखवून सभासद यांच्याकडून सन २०१९ ते २०२२ पर्यंत दर आठवडा रक्कम घेत दर महिन्याप्रमाणे १ कोटी ७९ लाख ८४ हजार १०० रुपये एवढ्या रकमेची सभासदाची आर्थिक फसवणूक केली आहे.



याप्रकरणी महादेव चंद्रकांत तुम्मा (वय-६७, रा.नीलकंठेश्वर मंदिर जवळ, साखर पेठ, सोलापूर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अशोक रामय्या कैरमकोंडा, अरविंद अशोक कैरमकोंडा व सुजाता अरविंद कैरमकोंडा (सर्व.रा.नारायण कन्या प्रशाला जवळ साखर पेठ,सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला असून,पोलीस निरीक्षक बहिरट हे पुढील तपास करीत आहे.

## महापालिका आता बड्या थकबाकीदारांवर कारवाई करणार
### पालिका आयुक्त तेली-उगले यांचे निर्देश

सुराज्य/सोलापूर

मिळकतदारांनी मिळकतकरावरील शास्ती माफीचा लाभ घ्यावा. मुदतीनंतर बड्या थकबाकीदारांवर महापालिकेकडून जप्तीची कारवाई करण्यात येईल तसेच त्यांची नावेही जाहीर करण्यात येतील, असे निर्देश पालिका आयुक्त शीतल तेली उगले यांनी दिले आहे

महापालिकेच्या वतीने शहर व शहर हद्दवाढ विभागातील ज्या मिळकतदारांची थकबाकी आहे, अशा मिळकतदारांची नोटीस फी, वारंट फी व शास्ती फी ८० टक्के माफ करण्यासाठी विशेष अभय योजना राबविली आहे. याची मुदत ३० नोव्हेंबर पर्यंत आहे मात्र या योजनेला मिळकतदारांकडून म्हणावा तेवढा प्रतिसाद मिळालेला नाही. अभय योजनेचा आतापर्यंत केवळ २०० जणांनी लाभ घेतला आहे. त्यामुळे पालिका आयुक्त शीतल तेली उगले यांनी या योजनेचा जास्तीत जास्त मिळकतदारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. मुदतीनंतर बड्या थकबाकीदारांवर महापालिकेच्या वतीने जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे तसेच मोठ्या थकबाकीदारांची नावे ही प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. ही कारवाईची मोहीम एक डिसेंबर पासून सुरू करण्यात येणार असल्याचेही त्या म्हणाल्या.



### ■ असे आहेत मिळकतदार

सोलापूर शहरांमध्ये एक ते तीन लाख थकबाकी असणारे ८ हजार ४५१ मिळकतदार आहेत तर ३ ते ५ लाख थकबाकीदार असणारे ५५९ मिळकतदार आहेत तर ५ ते लाख १० लाख थकबाकी असणारे ६१४ मिळकतदार आहेत.

### ■ आकडे बोलतात...

एकूण वसुली उद्दिष्ट : ६६१ कोटी* मागील उर्वरित थकबाकी : ४८३ कोटी* चालू वर्षातील थकबाकी : १७८ कोटी * या आर्थिक वर्षातील वसुली : ८९.६० कोटी

### ■ स्मार्ट सिटीच्या सीईओपदी आयुक्तांची नियुक्ती

सोलापूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनचे सीईओ त्र्यंबक ढेंगळे पाटील यांना राज्य शासनाने कार्यमुक्त केले असून त्यांच्या जागी महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांची नियुक्ती केली आहे. शुक्रवारी दुपारी आयुक्त तेली उगले यांना तसे आदेश प्राप्त झाले आहेत. २०२१ मध्ये महाराष्ट्र शासनाने स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या सीईओपदी ढेंगळे पाटील यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली होती. त्यानंतर एक वर्ष त्यांना मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर चार महिने त्यांना अधिक कार्यकाळ लाभला.

## शिलाई कामगाराने तरुणीवर केला अत्याचार

सुराज्य/सोलापूर

शिलाई मशीन दुरुस्त करणाऱ्या कामगाराने आकाशवाणी जवळ तसेच वळसंग रोडवरील लॉज मध्ये अत्याचार केल्याची तक्रार एका २१ वर्षीय तरुणीने एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे. या तक्रारींत त्या तरुणीने अत्याचार करणाऱ्या कामगार व त्यास पाठीशी घालणाऱ्या वडिलांविरुद्ध फिर्यादी दिली आहे.



शहरात २१ वर्षीय तरुणीने आपल्या घरी शिलाई मशीन दुरुस्त करण्यासाठी येणाऱ्या कामगाराने आपल्यावर आकाशवाणी केंद्राच्या बाजूला एका वस्तींत तसेच लॉजवर अत्याचार केला.ही घटना वडिलांच्या कानावर घातली असताना सुद्धा वडिलांनी उलट आपल्यालाच दमदाटी केल्याचे या फिर्यादींत म्हटले आहे. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलीस ठाण्यात झाली आहे. दोघांना अटक करण्यात आली असून, आज (शनिवार) न्यायालयात त्यांना हजर करण्यात येणार आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन पेटकर हे करीत आहेत.

## पहिल्याच वनडे सामन्यात न्यूझीलंडचा भारतावर विजय


**ऑकलँड :** भारत विरुद्ध न्यूझीलंड हा पहिला एकदिवसीय सामना न्यूझीलंडच्या ऑकलंड येथे नुकताच पार पडला. या सामन्यात न्यूझीलंडने जबरदस्त फलंदाजीचं दर्शन घडवत ३०७ धावांचं आव्हान केवळ ४७.१ षटकांत तीन गडी गमावून पूर्ण करत भारतावर ७ विकेट्सनी विजय मिळवला आहे.



मालिकेतील पहिल्याच सामन्यात विजयासह तीन सामन्यांच्या मालिकेतही किवींनी १-० अशी आघाडी घेतली आहे. आधी नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय न्यूझीलंडने केला. ज्यानंतर भारताने सलामीवीर शिखर धवन-शुभमन गिल यांच्या अर्धशतकांसह श्रेयस अय्यरच्या ८० धावांच्या जोरावर ३०६ धावां केल्या. ज्या न्यूझीलंडने टॉम लेथमच्या नाबाद १४५ आणि कर्णधार केनच्या नाबाद ९४ धावांच्या जोरावर पूर्ण करत सामना जिंकला. न्यूझीलंडचा संघ ३०७ धावा करण्यासाठी मैदानात उतरला. भारताला पहिलं यश लगेचच मिळालं २२ धावा करून फिन ॲलन बाद झाला. शार्दूलनं त्याला बाद केलं. टॉम लेथम फलंदाजीला आला आणि त्याने केनसोबत मिळून सामना ४७.१ षटकातच न्यूझीलंडला जिंकवून दिला. या दोघांनी एक अभेद्य भागीदारी करत सामना न्यूझीलंडला ७ गडी राखून जिंकवून दिला.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



कर्नाटक–महाराष्ट्र असं किती मोठं अंतर कापाव लागतं आपल्याला!!

| कल्याण |
|---|
| 368-74-130 |

| मेन बाजार |
|---|
| 224-81-399 |

## जिल्हा प्रशासन हतबल; केवायसीला प्रतिसाद मिळेना
# पावने दोन लाख शेतकऱ्यांनी केली नाही केवायसी

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यात पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी करण्यात येणाऱ्या केवायसीला प्रतिसाद मिळेना झाला आहे. मुदतवाढ देऊन ही अद्याप केवायसी पासून तब्बल पावने दोन लाख शेतकऱ्यांनी. वंचित आहेत. यामुळे जिल्हाप्रशासन हतबल झाले आहे.

३१ डिसेंबर पर्यंत शेतकऱ्यांनी केवायसी करून घ्यावी अन्यथा पीएम किसन योजनेपासून वंचित राहाल असे आवाहन जिल्हाकृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे यांनी केले आहे. सोलापूर जिल्हा केवायसी मध्ये खूप मागे होता. फक्त ४२ टक्के काम झाले होते. जिल्हाकृषी विभागाच्या वतीने जनजागृती करत तीन वेळा शेककऱ्यांना मुदतवाढ दिली






दिलेल्या मुदतवाढी मध्ये ४२ टक्केचे काम ७२ टक्के पर्यंत गेले आहे. मात्र शंभर टक्के काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या योजनेला शेतकऱ्यांनी प्रतिसाद देणे बंद केले आहे. त्याशिवाय जे मोबाईल नंबर शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे दिले त्यानुसार केवायसी करण्याचा प्रयत्न केल्यास सदरचा मोबाईन नंबर बंद अथवा दुसऱ्यांच्या नावावर दाखवत असल्याने प्रशासनाची मोठी अडचण झाली आहे. शेतकरी स्व:ताहून केवायसीसाठी पुढे येत नसल्याने प्रशासन देखील हतबल झाले आहे. आता पर्यंत एक लाख ७० हजार केवायसी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. ६ लाख ९ हजार ७०४ शेतकरी आहेत त्यापैकी आतापर्यंत ४ लाख ३८ हजार ९ ६१ शेतकऱ्यांनी केवायसी पूर्ण केली आहे. शेतकऱ्यांनी अद्यापही आपली केवायसी पूर्ण केलेली नाही. हे शेतकरी आता 'पीएम किसान' योजनेतून मिळणाऱ्या अनुदानापासून वंचित राहणार आहेत

केवायसी न केलेल्यामध्ये पंढरपूर तालुका आघाडीवर आहे. या तालुक्यातील तब्बल २३ हजार ६६४ शेतकऱ्यांनी केवायसी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानंतर सांगोला तालुका आहे तब्बल २१ हजार १३ शेतकऱ्यांनी केवायसी केली नाही.

त्यानंतर माढा आणि माळशिरस तालुक्याचा समावेश होते दोन्ही तालुक्यातील अनुक्रमे १८ हजार ३१ तर १८ हजार ७९५ शेतकऱ्यांचा समावेश आहे. अक्कलकोट( १७१७६ ), बार्शी (१३६५ ९), करमाळा (१५१५०), मंगळवेढा (१३३७३), मोहोळ (११५४०) दक्षिण सोलापूर (१३०८८) उत्तर सोलापूर (५२५१) अशी आकडेवारी समोर आली आहे. अद्याप एक महिना शिल्लक आहे. ३१ डिसेंबर शेवटची मुदत आहे. या कालावधीत केवायसी पासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांनी केवायसी करण्याचे आवाहन शिंदे यांनी केले आहे.

# स्वागतार्ह पाऊल

आज भारतीय संविधान दिन. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यावेळच्या नेत्यांनी एकत्रित बसून देशाची घटना तयार केली आणि २६ नोव्हेंबर १९४९ साली संविधान समितीने ती स्वीकारली. त्यानंतर २६ जानेवारी १९५०ला ती घटना अंमलात आली. २६ नोव्हेंबरच्या या दिवसाचे महत्त्व देशातील नव्या पिढीला कळावे तसेच संविधानाचा जागर व्हावा म्हणून संविधान दिन साजरा केला जातो.या दिनाचे औचित्य साधून सर्वोच्च न्यायालयाकडून एक परिवर्तनाचे पाऊल टाकले जात आहे,याचा एक विशेष आनंद देशाला असणार आहे. आपल्याकडे न्याय व्यवस्थेबद्दल नेहमी असे बोलले जाते की- न्यायाला विलंब म्हणजे न्यायाला नकार. ही टीका खरी असली यावर वाद नसेल, तर प्रलंबित खटले वेगाने निकाली काढणे गरजेचे आहे. ते घोडे अडले आहे, न्यायाधीशांच्या नियुक्त्यांपाशी. नेमका हाच मुद्दा नवीन सरन्यायाधीशांनी मांडला आहे, हे महत्त्वाचे. सामान्य जनतेला त्वरित न्याय मिळवून देण्यासाठी आपले प्रयत्न असतील, असे भारताचे नवनियुक्त सरन्यायाधीश न्या.धनंजय चंद्रचूड यांनी एका मुलाखतीत सांगितले. न्यायाधीशांच्या रिक्त जागा तातडीने भरणे हा त्यांचा अग्रक्रम असेल. या वर्षीच्या संविधान दिनी, म्हणजे २६ नोव्हेंबर रोजी देशाचे सरन्यायाधीश व उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशांची एक संयुक्त बैठक होणार आहे. रिक्त जागा भरण्याबद्दल त्यात काही ठोस निर्णय घेतले जातील, अशी अपेक्षा आहे. सद्य परिस्थिती अशी आहे की, भारतीय न्यायसंस्थेमध्ये असलेल्या प्रलंबित खटल्यांच्या



महाकाय डोंगरामुळे सामान्य नागरिकांचा न्यायपद्धतीवरचा विश्वास कमी होत चालला आहे आणि त्याच्या मनात आपले प्रजासत्ताक खरोखरच कायद्याचे राज्य आहे का? अशी भावनाही निर्माण झाली आहे. न्यायसंस्थेशी संलग्न असलेल्या सर्वच माननीय व्यक्तींचे सध्याच्या परिस्थितीत बदल करण्याबाबत एकमत असते. पण त्याला मूर्त स्वरूप येत नाहीय. सुचविलेला मार्ग त्यांना बाळबोध वाटतो. न्यायपद्धतीत सुधारणांची गरज आहेच. पण सर्वप्रथम उपाय म्हणून रिक्त जागा भरण्यासारखा सोपा मार्ग नाही. प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्यासाठी न्यायाधीशांच्या संख्येत दुप्पट-तिप्पट वाढ करावी लागेल, असा एक अशक्यप्राय विचार पुढे आल्यावर काहीच कारवाई झाली नाही.आता रिक्त पदे का निर्माण होतात व वर्षानुवर्षे का भरली जात नाहीत याचे विश्लेषण करणे उपयुक्त ठरेल. रिक्त पदे उद्भवतात ती निवृत्ती, वाढीव मंजूर पदे, राजीनामे, पदोन्नती, मृत्यू या कारणांमुळे. योग्य वेळी न्यायाधीशांच्या नियुक्त्या केल्या तरच आपली न्यायव्यवस्था सुधारेल याची जाणीव नसावी. नाही तर इतक्या प्रमाणात आणि सर्वच न्यायालयात रिक्त जागा राहू शकल्या नसत्या. मुळात जागा भरण्याची जबाबदारी न्यायालयाची आहे, असे मानले गेले नाही आणि अजूनही तीच परिस्थिती आहे. कनिष्ठ न्यायालयांची रिक्त पदे तातडीने भरणे फार महत्त्वाचे आहे. त्या विलंबामुळे कित्येक आरोपी खूप काळ कच्च्या कैदेत तुरुंगात असतात आणि कधी कधी तर आरोप सिद्ध झाल्यावर मिळणाऱ्या शिक्षेच्या कालावधीपेक्षा जास्त काळ. प्रलंबित खटल्यांचा विषय निघाला की- सर्वच विषयांचा आणखी अभ्यास करण्याची गरज, न्यायमूर्ती संख्या काही पटीने वाढविणे, इतर देशांच्या तुलनेत आपल्या देशात न्यायमूर्ती : लोकसंख्या हे व्यस्त प्रमाण अशा चर्चा कानावर पडते. या पार्श्वभूमीवर, सरन्यायाधीश न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी घेतलेल्या पुढाकाराचे स्वागत करायला हवे. योग्य काळात न्यायदान झाले पाहिजे या बाबतीत कोणीतरी जबाबदारी स्वीकारली पाहिजे. सरन्यायाधीशांनी ही स्वीकारली आहे असे वाटते. त्यांनी उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशांवर त्या त्या न्यायालयात नियुक्त्या होण्याची जबाबदारी टाकावी. असे होणे फार गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयातील नियुक्त्या न्यायालयांच्या अधिकारात असतात. कनिष्ठ न्यायालयातील नियुक्त्या राज्य सरकारे व त्या राज्याच्या उच्च न्यायालयाच्या अधिकार कक्षात येतात. सुरुवात स्पर्धात्मक परीक्षेपासून होते. न्यायाधीशांचे मासिक उत्पन्न आता खूप आकर्षक आहे. असे असूनही नियुक्ती करता येत नसेल तर उमेदवारांबद्दल आपले मापदंड खूप उच्च तर नाहीत ना, याचा विचार करायला हवा. न्यायाधीशांच्या नियुक्तीबाबत केंद्र सरकारच्या अखत्यारितील कायदा मंत्रालयाची मान्यता लागते.तेव्हा नियुक्त्यांचा विषय आला की-सरकारकडे बोट केले जाते.त्यामुळे सरकारने देखील याकडे गांभिर्याने पाहिले पाहिजे. वाजवी वेळेत योग्य न्याय मिळणे हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे.

संविधान दिन

# भारतीय संविधान दिन

**भारतीय संविधानाचा** (Indian Constitution Day) **स्वीकार केला गेला तो दिवस म्हणजे २६ नोव्हेंबर. भारतात दरवर्षी हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संसदेने अधिकृतपणे संविधानाचा स्वीकार केला. भारतीय संविधान दिवस यानिमित्त आपल्या राज्यघटनेविषयी..**

भारताची राज्यघटना हे भारत देशाचे संविधान किंवा पायाभूत कायदा (legal basis) आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राज्यघटनेचे शिल्पकार आहेत. भारतीय संविधानावर विविध पाश्चात्य संविधानांचा प्रभाव आहे. नोव्हेंबर २६ इ. स. १९४९ रोजी राज्यघटनेचा स्वीकार केला गेला व २६ जानेवारी १९५० पासून राज्यघटना अंमलात आली. १९५० साली अंमलात आलेले भारतीय संविधान मुख्यत्वे १९३५च्या भारत सरकार कायद्यावर (Government of India ct of 1935) वर तसेच ब्रिटन, आयर्लंड, जपान, अमेरिका, दक्षिण आफ्रिका, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, कॅनडा यांच्यासह अन्य देशांच्या मसुद्यांनी प्रेरित आहे. संविधान बनवायला इतके दिवस लागले

संविधान बनवण्यासाठी २ वर्षे ११ महिने १८ दिवस लागले होते. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी हे पूर्णपणे तयार झाले. भारतीय प्रजासत्ताकाची ही राज्यघटना २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाली. संविधानाची मूळ प्रत प्रेमिबिहारी नारायण रायजादा यांनी लिहिली होती. हे उत्कृष्ट कॅलिग्राफीद्वारे इटॅलिक अक्षरात लिहिलेले आहे. राज्यघटनेच्या मूळ प्रती हिंदी आणि इंग्रजी या दोन भाषांमध्ये लिहिण्यात आल्या होत्या. आजही भारताच्या संसदेत त्या सुरक्षितपणे ठेवल्या आहेत. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली संविधान समिती स्थापन झाली. अनेक बैठकांनंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारला गेला. यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिन (Indian Constitution Day) म्हणून साजरा केला जातो. नागरिकत्व, निवडणुका व अंतरिम संसदेविषयींचे आणि इतर काही तात्पुरत्या बाबी तात्काळ लागू झाल्या. संविधान संपूर्ण रूपाने २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाले. त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस भारतीय प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो. संविधान सभेची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी झाली. संसद भवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये झालेल्या या बैठकीत २०७ सदस्य उपस्थित होते. संविधान सभा स्थापन झाली तेव्हा या विधानसभेत ३८९ सदस्य होते पण नंतर त्यांची संख्या २९९ पर्यंत कमी झाली. या सभेचे कामकाज २ वर्षे ११ महिने, १८ दिवस : १६६ दिवस सुरू होते.

**संविधानाचा उद्देश** : देशात राहणाऱ्या सर्व धर्मांच्या लोकांमध्ये एकता, समानता असावी आणि सर्व लोकांना कोणताही भेदभाव न करता त्यांचे हक्क मिळावेत म्हणून संविधान बनवले गेले. भारताच्या राज्यघटनेमध्ये प्रस्तावना लिहिली गेली आहे, ज्याला भारतीय राज्यघटनेचे प्रस्तावना पत्र म्हणतात. या प्रस्तावनेत, ते भारतातील सर्व नागरिकांसाठी न्याय, स्वातंत्र्य, समानता सुरक्षित करते आणि लोकांमध्ये बंधुभाव वाढवते.

२६ नोव्हेंबर हा दिवस पहिल्यांदा कायदा दिन म्हणून साजरा करण्यात आला. याचे कारण म्हणजे १९३० मध्ये काँग्रेस लाहोर परिषदेने पूर्ण स्वराजची प्रतिज्ञा पास केली होती. या घटनेच्या स्मरणार्थ कायदा दिन साजरा करण्यात आला. त्यानंतर १९ नोव्हेंबर २०१५ रोजी भारत सरकारच्या सामाजिक न्याय मंत्रालयाने २६ नोव्हेंबर हा संविधान दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. लोकांमध्ये संविधानाविषयी जागृती व्हावी आणि संविधानिक मूल्यांचा प्रसार व प्रचार व्हावा, यासाठी हा निर्णय घेण्यात आला.





भारताची राज्यघटना उद्देशिका (Preamble), मुख्य भाग व १२ पुरवण्या (परिशिष्टे) अशा स्वरूपात विभागली आहे. मुख्य संविधानाचे २२ विभाग असून त्यांची अनेक प्रकरणांमध्ये विभागणी केलेली आहे. सुरूवातीच्या ३९५ कलमांपैकींची काही कलमे आता कालबाह्य झाली आहेत. सध्या राज्यघटनेत ४४८कलमे (३९, ५१ यांसारखे कलमे घटना दुरुस्तीद्वारा) असून भारतीय संविधान जगातल्या सर्वांत मोठ्या संविधानांमध्ये मोडते. मूळ इंग्रजी मसुद्यात १ लाख १७ हजार ३६९ शब्द आहेत.

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेप्रमाणे भारत हे सार्वभौम (Sovereign), समाजवादी (Socialist), धर्मनिरपेक्ष (Secular), लोकशाही (Democratic) प्रजासत्ताक (Republic) आहे. मूळ उद्देशिकेत समाजवादी (Socialist) व धर्मनिरपेक्ष (Secular) हे शब्द नव्हते. राज्यघटनेच्या ४२व्या दुरूस्तीद्वारे ते उद्देशिकेत समाविष्ट करण्यात आले. प्रस्तावनेत आतापर्यंत झालेली ही एकमेव घटनादुरुस्ती आहे.

काही महत्वपूर्ण वैशिट्ये - १) मूलभूत आधिकार २) मूलभूत कर्तव्ये ३) सरकारसाठींची मार्गदर्शक तत्वे ४) संघराज्य प्रणाली. विभाग - १. प्रशासकीय (Executive) २. विधीमंडळे (Legislative) ३. न्यायालयींन (Judicial)

**१. प्रशासकीय** (Executive) : भारताच्या केंद्रीय कार्यकारी मंडळात राष्ट्रपती, प्रधानमंत्री आणि मंत्रिमंडळ यांचा समावेश होतो.

**राष्ट्रपती** : भारताच्या संविधानातील तरतुदींनुसार राष्ट्रपती हे सर्वोच्च राष्ट्रप्रमुख आहेत. राष्ट्रपतींचे पद अतिशय सन्मानाचे आणि प्रतिष्ठेचे असून ते भारतीय प्रजासत्ताकाचे प्रतिनिधित्व करतात. संविधानाने देशाची संपूर्ण कार्यकारी सत्ता राष्ट्रपतींना दिली आहे. देशाचा राज्यकारभार राष्ट्रपतींच्या नावाने चालतो.

**प्रधानमंत्री आणि मंत्रिमंडळ** : राष्ट्रपती संविधानात्मक प्रमुख असतात. त्यांच्या हाती नाममात्र सत्ता असते व प्रत्यक्षात प्रधानमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ राज्यकारभार चालवते.

**२. विधीमंडळे** (Legislative) : भारताच्या संसदेची निर्मिती संविधानाने केली आहे. राष्ट्रीय पातळीवरील म्हणजे केंद्रीय शासन यंत्रणेच्या कायदेमंडळाला 'संसद' असे म्हटले जाते. त्यानुसार संसदेत राष्ट्रपती, लोकसभा व राज्यसभा यांचा समावेश असतो. राष्ट्रपती भारताच्या संसदेचे अविभाज्य घटक असतात. दोन सभागृहांना लोकसभा व राज्यसभा असे म्हटले जाते.

**लोकसभा** : भारतीय संसदेचे कनिष्ठ आणि प्रथम सभागृह म्हणजे लोकसभा. लोकसभा हे संसदेचे जनतेकडून थेटपणे निवडून येणारे सभागृह आहे. म्हणून लोकसभेला पहिले सभागृह असेही म्हणतात. लोकसभेच्या निवडणुकींसाठी भौगोलिक मतदार संघ निर्माण केलेले आहेत. लोकसभेची मुदत पाच वर्षांची असते. लोकसभेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. लोकसभा हे देशातील लोकांचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह आहे. लोकसभेची सदस्य संख्या संविधानानुसार जास्तीत जास्त ५५२ असते. आपल्या देशातील सर्व समाजघटकांना प्रतिनिधित्व मिळावे, म्हणून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी आरक्षण देण्यात आले आहे.

**राज्यसभा** : भारतीय संसदेचे वरिष्ठ आणि द्वितीय सभागृह म्हणजे राज्यसभा. भारताच्या संसदेचे राज्यसभा हे अप्रत्यक्षरीत्या निवडून येणारे सभागृह आहे. राज्यसभेत घटकराज्यांचे प्रतिनिधी सदस्य म्हणून काम करतात.

**३. न्यायालयींन** (Judicial) : भारत हे संघराज्य आहे. केंद्रशासन आणि घटकराज्यांना स्वतंत्र कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ आहे. परंतु न्यायमंडळ मात्र संपूर्ण देशासाठी एकच आहे. त्यात केंद्र व घटकराज्ये अशी स्वतंत्र विभागणी नाही. याचाच अर्थ भारतातील न्यायव्यवस्था एकात्म स्वरूपाची आहे.

**सर्वोच्च न्यायालय** : भारताचे सरन्यायाधीश सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख असतात. भारताच्या सरन्यायाधीशांची व अन्य न्यायाधीशांची नेमणूक राष्ट्रपतींकडून केली जाते. सर्वोच्च न्यायालयातील सर्वात ज्येष्ठ 'न्यायाधीश सरन्यायाधीश' या पदावर नेमले जावेत असा संकेत आहे.

**उच्च न्यायालय** : भारताच्या संविधानातील प्रत्येक घटकराज्यासाठी एक उच्च न्यायालय स्थापन करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला आहे. सध्या आपल्या देशात २४ उच्च न्यायालये आहेत. उच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश आणि अन्य काही न्यायाधीश असतात. उच्च न्यायालयातील सर्व न्यायाधीशांच्या नेमणुका राष्ट्रपती करतात.

**जिल्हा व दुय्यम न्यायालये** : ज्या न्यायसंस्थांशी लोकांचा नेहमी संबंध येतो ती जिल्हा आणि तालुका पातळीवरील न्यायालये होत. प्रत्येक जिल्हा न्यायालयात एक जिल्हा न्यायाधीश असतो. भारतातील कायदा पद्धतींच्या शाखा : कायदा पद्धतींच्या प्रमुख दोन शाखा आहेत. (१) दिवाणी कायदा (२) फौजदारी कायदा.

टुडेज ब्लॉग

# आपण तारुण्य जाळत आहोत याचा विचार कधी करणार?

**प्रेमाचे नाटक करून हिंदू मुलीला जवळ केले. काम संपल्यानंतर तिचे थंड डोक्याने ३५ तुकडे केले. ते फ्रिझमध्ये ठेवले. हिंदू मुलांनी मुसलमान मुलीशी लग्न केले म्हणून त्या हिंदू मुलाची हत्या करून ८० तुकडे केले गेले. आमच्या तपास यंत्रणा काय करतील आणि त्याचा उपयोग किती होईल आजच्या लेखाचा विषय नाही.**

**आज आम्ही जो विचार व्यक्त करणार आहोत, तो जरा वेगळ्या वाटेवरचा आहे. स्वच्छंद असणे आणि स्वतंत्र असणे म्हणजे नेमके काय? याचा विचार करावयास कोणासच वेळ नाही. स्वातंत्र्यानंतर नव्याने मांडण्यात आलेल्या राज्यघटनेने नागरिकांना अधिकार दिलेले आहेत. त्या अधिकाराला आम्ही घट्ट धरून बसलेले आहोत. आपल्या देशातील प्रथा, परंपरा, संस्कार, संस्कृती आणि सभ्यता ही हजारो वर्षांची आहे.यात नियम आहेत, नियमन आहे. ते समाज स्वास्थ्यासाठी आहेत. यात बदल झालेले आहेत. कालानुरूप सुधारणा झालेल्या आहेत. समाजाने त्या स्वीकारलेल्या आहेत. या सगळ्या गोंधळात आमच्या मुला-मुलींची लग्नाची वये किती वाढत चाललेली आहेत, याकडे लक्ष देण्यासाठी कोणासच वेळ नाही. मुला-मुलींची लग्नाची वये काय असावीत, याबाबत सरकारने कायदे केलेले आहेत. पण हे कायदे करत असताना मुला-मुलींच्या शरीरात होणारे बदल विचारात घेऊन त्यात बदल करावेत, अशी इच्छा सरकारची दिसत नाही.**

सध्या समाजात दोन मोठे प्रश्न आहेत. पहिला प्रश्न आहे लग्न लवकर होत नाहीत. वयाची पंचविशी, तिशी, पस्तिशीच काय अगदी ४०-४५ वर्षापर्यंत लग्न न झालेली मुलं मुली समाजात दिसत आहेत. दुसरा विषय आहे, तो म्हणजे मुली साधारणतः ११-१२ व्या वर्षी शहाण्या होत आहेत, म्हणजे वयात येत आहेत आणि मुलेही १६-१७ वर्षापासून शहाणी होत आहेत. याचा साधा सोपा अर्थ निसर्ग नियमाने त्यांच्या शारीरिक भुकेस सुरुवात होत आहे. याचा समाज म्हणून आपण काय विचार करणार आहोत? काय व्यवस्था लावणार आहोत?

पूर्वी लग्न पाळण्यातच होत होती. म्हणजे मुलगा किंवा मुलगी जन्मले की, याला मी जावई करून घेत आहे. ही माझी सून झाली असे शब्द दिले जायचे. ते शेवटपर्यंत पाळलेही जायचे. किंमत शब्दांना होती. पुढे जाऊन मुली शहाण्या झाल्या म्हणजे वयात आल्या, म्हणजे पहिले मुलगी शहाणी झाली की- तिच्या लग्नाची घाई केली जायची आणि लग्न लावून दिले जात होते. साधारणतः १४ ते २० या वयाची ही मुलं मुली असायची. त्यांची लग्ने व्हायची. ती आपल्या संसाराला लागायची. अर्थात या त्यांच्या नव्याने थाटलेल्या संसारात त्यांना एकटे पण कधीच जाणवले नाही. कारण कुटुंबातील सर्व सदस्यांच्या बरोबर ती राहत असत. अशी लग्न का लावून दिली जात होती? त्यामागची कारणे काय होती? याचा कधी मोकळ्या मनाने विचार केला गेला आहे काय? आता ज्या विचाराने लग्नाची वये वाढवलेली आहेत, ते विचार तरी साध्य झालेले आहेत काय? याचा तरी कधी आम्ही मागोवा घेणार आहोत काय? मुला मुलींनी स्वतःच्या पायावर उभारल्याशिवाय, आपापली स्वतःचे उत्पन्न मिळवावयास सुरुवात केल्याशिवाय, लग्न करावयाची नाहीत. हा आता एक अलिखित नियम झालेला आहे. अशी स्वतःच्या पायावर उभी राहिलेली मुले आणि मुली लग्नानंतर सुखी आणि समाधानी आहेत काय? याचा मागोवा कोण घेणार आणि कसा घेणार?



श्रद्धा वालकर मर्डर केसच्या निमित्ताने...

मुला-मुलींची लग्नाची वये वाढत आहेत. वयात आल्यापासून लग्नापर्यंतचा जो कालावधी आहे तो निसर्ग नियमांचा विचार केला तर खूप मोठा आहे. हा उमेदीचा कालावधी आहे. अंगात रग आणि मस्ती असणारा हा कालावधी आहे. चिंता करण्यात आपण तो घालवतो आहोत. या कालावधीत आपल्या पोटाची भूक भागवली जाते. पण शरीराची भूक मात्र मारत असतो. या शरीराच्या भुकेतच रस्ता चुकण्याची शक्यता खूप आहे. विशेषतः मुली जर का चाळवल्या गेल्या तर तो धोका अधिक आहे. अनैतिक संबंध आणि लग्नापूर्वीच शरीर संबंधाचा घेतलेला अनुभव यात आता दिवसेंदिवस वाढ होत आहे.

समाजात दिवसेंदिवस वाढणारे बलात्कार, अनैतिक संबंध आणि शरीर भुकेपोटी वाकडी पडणारी पावले ही आज एक मोठी समस्या झाली आहे. समाज म्हणून यावर आपण विचार करणार आहोत का नाही? पूर्वी घरात भरपूर माणसे होती. मुला मुलींवरती लक्ष असायचे. त्यांना धाक असायचा. चुकली तर त्यांना समजून सांगणारे आणि आवरणारी माणसे होती. आज मितीस सगळेच स्वतंत्र झालेले आहेत. आई-वडिलांचा धाकही मुलामुलींस राहिलेला नाही. त्यांना समजून सांगणारी, सांभाळणारी व्यवस्था ही समाजातून लोप पावत चाललेली आहे. यातून परत स्वच्छंद वागणूक. सोबत शरीराची भूक चाळवणारी साधने मुला-मुलींच्या हातात आलेली आहेत. हीच भूक शांत करण्याकरता लग्न पद्धती अस्तित्वात आलेली होती व आहे. लग्नासाठी वाढणारी वये शरीर स्वास्थासाठी आणि समाज स्वास्थ्यासाठी घातक नाहीत का? आणि यावर समाज म्हणून आपण काय विचार करणार आहोत? सरकारला अशा कोणत्याही प्रश्नांचे देणे घेणे नसते हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आपल्या मुला मुलींचे तारुण्य आपण जाळत आहोत याचा कधी गांभीर्याने विचार होणार आहे का नाही?

**- श्रीनिवास वैद्य, सोलापूर.**

बोधकथा

## बळी तो कान पिळी



एकदा प्राण्यांमध्ये रोगाची साथ सुरू होऊन हजारो प्राणी मरू लागले. आपण फार पाप केल्यामुळे देवाने हा कोप केला आहे असे सर्व प्राण्यांना वाटून त्यांनी आपली वाईट कृत्ये कबूल करायचे ठरविले व जो सर्वात मोठा अपराधी ठरेल त्याने देवाच्या कोपाला शांत करण्यासाठी बळी जावे असे ठरले. ठरल्या वेळी सगळेजण हजर झाले व न्यायाधीशाच्या जागी एकमताने कोल्ह्याची निवड केली गेली. प्रथम सिंहाने पुढे होऊन कबुली दिली, मी फार गरीब कोकरांना ठार मारलं, एवढंच नव्हे तर फार भूक लागल्याने एका धनगरालाही ठार मारून खाल्लं.' त्यावर न्यायाधीश म्हाराज मोठ्या गंभीरतेने म्हणाले, एखाद्या सामान्य प्राण्याने अशा गोष्टी केल्या असत्या तर नक्कीच मोठा अपराध ठरला असता. पण महाराजांना इतरांपेक्षा जास्त सवलती असतात. मूर्ख बकऱ्या नि एकच धनगर खाणं हा काही मोठा अपराध नाही.'


या निकालामुळे हिंस्र प्राण्यांनी कोल्ह्याची तारीफ केली. यानंतर वाघ, चित्ता, अस्वल वगैरे प्राण्यांनी आपापल्या कबूली दिल्या व कोल्ह्याने वरीलप्रमाणेच निकाल दिला.

शेवटी एक गरीब गाढव पुढे येऊन म्हणाले, एका शेतकऱ्याच्या इनाम जमिनीतलं मूठभर हिरवं गवत मी खाल्लं आणि त्याबद्दल मला पश्चात्ताप' काय पश्चात्ताप?' न्यायाधीश झालेले कोल्होबा ओरडले. अरे पाप्या नक्कीच तुझ्या पापामुळे सध्या हा देवाचा कोप झालेला आहे. यालाच मरणाची शिक्षा योग्य आहे !' असा निकाल कोल्होबांनी देताच सगळ्यांनी मिळून त्या बिचाऱ्या गाढवाला ठार मारले.

**तात्पर्य : - बळी तो कान पिळी.**

जन्म हा अखेरचा

## धर्माचारस्थल - ३



त्याने हनुमंताला विचारले, तू रावणाचे सिंहासन आणायला निघालास खरा, पण त्यासाठी प्रभू रामचंद्रांची अनुमती घेतली आहेस का?

''आमची सर्व चर्चा त्यांनी ऐकली. त्यावर ते काही बोलले नाहीत आणि मी इकडे निघाल्यावर त्यांनी मला अडवले नाही. यावरुन त्यांची याला संमती आहे असे सिद्ध होते. ''हनुमंत म्हणाला.

''हनुमंता, जांबुवंत हसून म्हणाला, 'काही गोष्टी गृहीत धरणे उचित नव्हे, त्यासाठी आज्ञा घ्यायला हवी. चल, आपण प्रभू श्रीरामचंद्रांकडे जाऊन त्यांनाच विचारु.''

दोघेही श्रीरामाकडे आले. जांबुवंताने सर्व प्रकार प्रभू श्रीरामांना कथन केला. तेंव्हा श्रीराम म्हणाले, 'त्यात एवढे ते काय?'

''प्रभू, जांबुवंत हात जोडून म्हणाला, अशी घटना याआधी कधी घडली नाही. हे विपरीत आज घडत आहे. लंकेवर विजय मिळविण्याआधी बिभीषण आपल्याकडे आला असताना आपण सर्वांच्या साक्षीने बिभीषणाच्या डोक्यावर समुद्रजलाने अभिषेक करुन या नगरीचा तू अधिपती आहेस, असे घोषित केले होते. त्यामुळे रावणाच्या सिंहासनावर आता बिभीषणाचा अधिकार आहे. रावणाचे सिंहासन आपण बिभीषणाला दिले आहे. एकदा दिलेली वस्तू परत घेणे वीर पुरुषाला शोभत नाही.''

**(क्रमशः) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

# गुरव समाज काल आणि आज : एक चिंतन

गुरव समाजाचे आद्यपुरुष संत श्री काशीबा महाराज यांनी हा समाज त्याकाळी सुशिक्षित आणि शब्दअक्षर संपन्न होता,हे दाखवीत आहेत. मंगल वाद्यातून मांगल्य, तुतारीमधून वीरश्री निर्माण केलेल्या या कलावंताचा कलावंत असलेल्या या समाजाने शैक्षणिक ,सांस्कृतिक ,आध्यात्मिक क्षेत्रात आपले नाव खुद्द काळाच्या छाताडावर नोंदवून ठेवले आहे. अशा गुरव समाजाला सद्य परिस्थितीत दुहीच्या, गट, तटाच्या म्हणजेच फाळणीच्या शापाने ग्रासले आहे की काय असे वाटत आहे. असे दुर्दैवी चित्र निर्माण झाले आहे. वैयक्तिक मतलबापोटी कोण अहमहिका लागली आहे.कोण कुण्या एका पक्षाच्या दावणीला बांधू पहातोय. तर कोण वैयक्तिक स्तोम माजवतोय. एकेकाळी शौर्य आणि त्यागाची परिसीमा ओलांडलेल्या मात्र सद्यस्थितीमध्ये अल्पसंख्यांकी आणि विखुरलेल्या वाली नसलेल्या या पोरक्या समाजाला स्वयंभू पुढाऱ्यांनी घेराटलेले आहे. याचे सारे पडसाद सोशल माध्यमावर तरुणाई अत्यंत संतापाने मांडते आहे. ही खदखद अतिशय नैसर्गिक अशीच म्हणावी लागेल. कारण आज हा समाज समस्यांच्या चक्रव्यूहात अडकला आहे. तरुणाई बेकारीने त्रस्त आहे आहे. कोणताच रस्ता त्यांना सापडत नाही. आर्थिकदृष्ट्या अतिशय विपन्न अवस्थेत हा समाज पिचला आहे. दारिद्र्याचे चटके घरोघरी बसू लागलेले आहेत. विद्यार्थी आर्थिक बाजूने( पालक दुबळे असल्यामुळे) शिक्षण अर्धवट सोडत आहेत. या समाजातील शेतकरी, कामकरी, कष्टकरी विविध छोट्या-मोठ्या कारणाने ग्रासलेला आढळतो आहे. त्याला रस्ता सापडत नाही. आहे रे वाला वर्ग आपल्या तोऱ्यात असल्याने त्यांना या दुबळ्या माणसांची फिकिर नाही आणि अशा समाजाच्या नावावर कांही हिकमती दांभिक, वैयक्तिक लाभापोटी एकमेकांवर कुरघोड्या करीत असल्याचे संताप जनक चित्र समाज बांधवांमध्ये चीड उत्पन्न करीत आहे. यामध्ये खरोखर समाजाविषयी तळमळ आणि काहीतरी भक्कम करण्याची धमक असलेले नेते कार्यकर्ते भरडले जात आहेत. हे मात्र सत्य नाकारता येत नाही. चेहराच नसलेल्या या समाजाला चेहरा देण्याची आज आज गरज निर्माण झालेली आहे. कारण या समाजावर अतोनात अन्याय, अत्याचार होत आहेत. परवाच एका बांधवाने या साऱ्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याचा एक संताप जनक प्रकार घडलेला आहे. आता तरी या समाजाला संरक्षण देणे अनिवार्य आहे. आणखी किती परीक्षा सरकार घेणार आहे हे माहीत नाही. ताडमाड उंच वाढलेल्या झाडांची ना धड फळे मिळतात, ना सावली मिळते. हे लोक समाजाला गिनत नाहीत. फक्त आपले आणि आपल्या लोकांचे स्वार्थ पाहतात. मी मोठा, तू मोठा या द्वेष मत्सराच्या जात्याखाली मात्र समाज बांधव नाहक चिरडले जात आहेत. या व अशा प्रकारच्या अनेक नकारात्मक चर्चा सातत्याने समाज बांधव आपापसात करीत असतात. या उघड वंदते मध्ये या गोष्टींचा जास्त उल्लेख होतो. कोण कुठे समाजाच्या नावावर पैसा गोळा करतोय. तर कोण कांही मिळवतोय. समाजाच्या नावावर मोठं होणं वेगळं. आणि समाजाला मोठा करणे वेगळं. समाजाच्या भल्यासाठी सिद्ध असणं वेगळं आणि समाजाच्या नावावर क्षणभंगुर प्रसिद्धी मिळवणे वेगळं. आपल्या पूर्वसुरींनी, वाडवडिलांनी समाजासाठी खस्ता खाऊन त्याग करून समाजाला चांगले दिवस यावेत म्हणून जीवन समर्पित केल्याचा इतिहास आहे आणि आज कोणाचाच पायपोस कुणाच्याच पायात नसल्याचे चित्र घातक ठरू पाहत आहे. केविलवाणी तरुणाई, मुलं हे सार उघड्या डोळ्यांनी पाहत आहेत. पन्नास वर्षापासून ज्या मागण्या आहेत, त्याच त्या ऐकून ऐकून कान किटू झाले. अनेकांचे जन्म गेले. कोणीही मनावर घेत नाही. काही महा भागांना समाज एक होणे हे धोक्याचे वाटते.कारण त्यांचा स्वार्थ साधला जाणार नाही. आज गरज निर्माण झालेली आहे की- या समाजाच्या मुलांसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी वसतिगृह होणे या बांधवांचे उत्पन्नाचे स्रोत वाढवण्यासाठी सर्व दृष्टीने सर्वकष प्रयत्न होणे गरजेचे आहे. कमालीचा दुर्लक्षित शोषित,आणि सोशिक गुरव समाज अधिवेशनास अंत:करण पूर्वक शुभेच्छा.

**- कवी देवेंद्र औटी, सोलापूर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# विकास न केल्यास कर्नाटकामध्ये जाण्याची तयारी

## कन्नड साहित्य परिषद महाराष्ट्र घटकाचे अध्यक्ष सोमशेखर जमशेट्टी यांची माहिती

सुराज्य/सोलापूर

**महाराष्ट्र-कर्नाटक सिमावाद हा अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. प्रत्येकवेळी अनेक राजकीय पक्षांनी आपल्या स्वार्थासाठी हा विषय प्रलंबित ठेवून राजकारण तापवत ठेवल्याचे दिसून येते. कित्येक वेळी हा मुद्दा उपस्थित करून सीमाप्रश्नाचे राजकारण केले जात आहे. यामध्ये विनाकारण सीमावर्ती भागातील कन्नड भाषिक दुखावला जात असून या भागातील जनतेला सन्मान न दिल्यास, विकास न केल्यास आम्ही ठराव करून कर्नाटकामध्ये जाण्याची तयारी दाखवू असा इशारा कन्नड साहित्य परिषद महाराष्ट्र घटकाचे अध्यक्ष सोमशेखर जमशेट्टी यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.**




या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाची सुनावणी होईल, या पार्श्वभूमीवर दोन्ही राज्यांच्या सीमावर्ती भागात हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. परंतु सोलापुर हा बहुभाषिकांचे शहर आहे. जिल्ह्यात कन्नड भाषिकांची संख्या मोठ्या प्रमाणात असूनही भाषामध्ये भेदभाव केला जात नाही. त्यात कन्नड-मराठी भाषिक कधीच भांडत नाही. सोलापूर जिल्ह्याचा विकास आणि तरुणांसाठी दर्जेदार शिक्षण आणि रोजगार हे आपल्यासाठी सर्वात महत्त्वाचे आहे. या भागातील कन्नड भाषिकांवर अन्याय होत असेल तर संघर्ष हाच आमचा मार्ग आहे. अनेक वर्षांपासून महाराष्ट्र आणि कर्नाटक सरकारकडून आमच्यावर अन्याय होत आहे. सीमा भागातील तरुणांना नोकऱ्या नसल्याने लोक नोकऱ्यांच्या शोधात महाराष्ट्रातील मुंबई, पुणे आणि कर्नाटकातील बेंगळुरूसारख्या शहरांमध्ये स्थलांतरित होत आहेत. दोन्ही सरकारांनी आमच्याकडे दुर्लक्ष केले. सीमेचा प्रश्न आला की ते आपल्याला आठवतात.

बसवराज बोम्मई यांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर महाराष्ट्रात कन्नड माध्यमाच्या शाळा आणि कन्नड भवन बांधण्यासह अनुदान देत आहेत. महत्त्वाचे म्हणजे दोन्ही राज्य सरकारने आम्हाला विकास, शिक्षण आणि रोजगारात विशेष आरक्षण दिले पाहिजे. उजनीतून हिळळीपर्यंत तीन पीएमसी पाणी सोडावे, आपल्या जिल्ह्यातील जनतेने विकास, शिक्षण, रोजगार यामध्ये सातत्याने अन्याय सहन केला आहे. दोन्ही राज्य सरकारांनी आमची समस्या समजून घेऊन त्यावर उपाययोजना कराव्यात, असे मागाणी सोमशेखर जमशेट्टी यांनी केली.

### बेळगावप्रमाणे सोलापूरला उपराजधानी करा

कर्नाटक सरकारने बेळगाववर अधिक भर देऊन विकास केल्याप्रमाणे महाराष्ट्र सरकारनेदेखील सोलापूर जिल्ह्याचा विकास करावा, या भागाच्या विकासासाठी सोलापूर शहरात मंत्रिमंडळ बैठक व विशेष अधिवेशन घेऊन चर्चा करून आपल्या भागातील समस्या सोडवाव्यात. सोलापूरला महाराष्ट्राची उपराजधानी म्हणून घोषित करावी, अशी मागणीही त्यांनी केली. यावेळी कर्नाटका रक्षणा वेदिकेचे जिल्हाध्यक्ष मल्लिनाथ करपे उपस्थित होते.

### सोयी सुविधा द्या

कर्नाटक सरकार ज्याप्रमाणे बेळगावला सोयी सुविधा देऊन उपराजधानीचा दर्जा दिलेला आहे. त्याप्रमाणे सोलापूर जिल्ह्याचा विकास व्हावा तसं न झाल्यास कर्नाटकामध्ये जाण्याची आमची मानसिकता असेल असे कर्नाटका रक्षणा भैदिकेचे जिल्हाध्यक्ष मल्लिनाथ करपे यांनी सांगितले.



## स.हि.ने.प्रशालेत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

**सोलापूर** : मराठी विज्ञान परिषद सोलापूर विभाग आणि श्री सरस्वती मंदिर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ आणि २६ नोव्हेंबर असे दोन दिवस स.हि.ने.प्रशाला सोलापूर येथे विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले. शुक्रवार दि. २५ रोजी १२.३० वाजता या प्रदर्शनाचे उद्‌घाटन मुख्य लेखा वित्त अधिकारी अजयसिंह पवार यांच्या हस्ते प्रयोग करून तसेच प्रदर्शनातील सहभागी विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सरस्वती मंदिर संस्था सोलापूरचे अध्यक्ष तुळजापूरकर, सचिव किरण करकमकर, सदस्य , रघुनाथ दामले उपस्थित होते. मराठी विज्ञान परिषद सोलापूर विभाग चे अध्यक्ष व्यंकटेश गंभीर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विज्ञान प्रदर्शनासाठी प्राचार्य तृप्ती बापट प्राध्यापक निर्मलकुमार कुलकर्णी, डॉ.अमित पाटसकर, प्राध्यापक प्रशांत शिंपी हे परीक्षक म्हणून काम पाहत आहेत. प्रास्ताविक मराठी विज्ञान परिषदेचे सचिव श्रीपाद येरमाळकर यांनी केले. परिचय संगीता रेळेकर यांनी करून दिला. आभार प्रदर्शन स.हि.ने. प्रशालेच्या मुख्याध्यापिका निता येरमाळकर यांनी केले. समारंभाचे सूत्रसंचालन नववी सोलापूरच्या सचिव प्रियांका आराध्य यांनी केले.

## मंगळवेढा येथे अनोळखी वाहनाच्या धडकेने दुचाकीवरील तरुण ठार

**सोलापूर** : वेगाने जाणाऱ्या अनोळखी वाहनाच्या धडकेने दुचाकी वरील तरुण ठार झाला. हा अपघात गुरुवारी रात्रीच्या सुमारास मंगळवेढा येथील हॉटेल सुगरण समोर घडला. जयानंद लक्ष्मण तरंगे (वय २२ रा. दर्गणहळळी ता.दक्षिण सोलापूर) असे मयताचे नाव आहे. ते काल रात्री १२ वाजेच्या सुमारास निंबोणी( ता.मंगळवेढा) येथून सोलापूरकडे दुचाकीवरून निघाले होते. मंगळवेढा येथील हॉटेल सुगरण समोर पाठीमागून अनोळखी वाहन धडकल्याने ते गंभीर जखमी होऊन जागीच मरण पावले. या अपघाताची फिर्याद मयताचे नातेवाईक बालाजी महानुर (रा. निंबोणी) यांनी मंगळवेढा पोलिसात दाखल केली. हवालदार पठाण पुढील तपास करीत आहेत.

## तळेहिप्परगा येथे विवाहितेस मारहाण; पतीसह तिघांविरुद्ध गुन्हा

**सोलापूर** : तू आमच्या समाजाची नाही. हुंडा म्हणून एक लाख रुपये आणावेत म्हणून सासरी छळ करून विवाहितेला मारहाण केल्याची घटना तळेहिप्परगा (ता.उत्तर सोलापूर) येथील राजदीप नगर येथे घडली. या प्रकरणात सोलापूर तालुक्याच्या पोलिसांनी विवाहितेची सासू सुकुमार देवकर, तिचा दिर विजयकुमार देवकर आणि पती नंदकुमार लक्ष्मण देवकर या तिघाविरुद्ध मारहाण आणि हुंडा मागितल्याचा गुन्हा दाखल केला. यासंदर्भात रेणुका नंदकुमार देवकर (वय २५) हिने पोलिसात तक्रार दाखल केली तिची सासू सुकुमार देवकर ही माहेरून एक लाख रुपये आण म्हणून छळ करीत होती. आई सोबत भांडण केले म्हणून दीर विजयकुमार याने तिला मारहाणीचा प्रयत्न केला. तर तिचा पती नंदकुमार देवकर यांनी गुरुवारी सकाळी तिला काठीने डोक्यात मारून जखमी केले. अशी नोंद पोलिसात झाली. फौजदार जाधव पुढील तपास करीत आहेत.

## अक्कलकोटे खून प्रकरणातील तिघांना जामीन

सुराज्य/बार्शी : बार्शी नगरपालिकेतील राष्ट्रवादीचे गटनेते नागेश अक्कलकोटे यांच्यावर आठ वर्षांपूर्वी झालेल्या खुनी हल्ल्यातील तिघांना शुक्रवारी बार्शी न्यायालयाने जामीन मंजूर केला.माजी नगरसेवक विजय राऊत, दीपक ढावारे, रणजीत चांदणे अशी जामीन मंजूर झालेल्या तिघांची नावे आहेत. सन २०१४ मध्ये या तिघांनी अक्कलकोटे यांच्यावर हल्ला केला होता. त्याप्रकरणी ते तब्बल ८ वर्षे ३ महिन्यांनी म्हणजे चार दिवसांपूर्वी पोलिसांपुढे हजर झाल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली होती. त्यानंतर न्यायालयाने त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली होती. याप्रकरणी बार्शीचे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी जे.ए. झारी यांनी शुक्रवारी त्यांचा जामीन मंजूर केला. याप्रकरणात आरोपींच्यावतीने ॲड. सागर रोडे, ॲड. राज पाटील आणि अक्कलकोटे यांच्यावतीने ॲड. राजश्री कदम, ॲड.विकास जाधव, ॲड. अक्षय काशिद यांनी काम पाहिले.

## 'रौंदळ' मधील 'मन बहरलं' गाणं प्रदर्शित

**सोलापूर** : राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या 'ख्वाडा' चित्रपटात मुख्य भूमिका साकारून नावारूपाला आल्यानंतर 'बबन' चित्रपटामध्ये डॅशिंग भूमिकेत दिसलेला भाऊसाहेब शिंदे मागील बऱ्याच दिवसांपासून आपल्या महत्त्वपूर्ण आगामी चित्रपटाच्या कामात बिझी आहे.'रौंदळ' असं महाराष्ट्राच्या लाल मातीतील रांगडं शीर्षक असणारा हा चित्रपट पहिलं पोस्टर रिलीज झाल्यापासूनच चर्चेचा विषय ठरला आहे. त्या मागोमाग आलेल्या टिझरनं 'रौंदळ'बाबतची उत्सुकता आणखी वाढवली आहे. मराठीसह हिंदी भाषेतही रिलीज होणाऱ्या या चित्रपटातील पहिलं गाणं नुकतंच रसिकांच्या भेटीला आलं आहे.

# दक्षिणमधील राष्ट्रवादीचा मंथन मेळावा ऐतिहासिक करण्याचा निर्धार

## ■ नव्या वर्षात दक्षिण सोलापूरची कार्यकारिणी बदलणार : करजोळे

सुराज्य/दक्षिण सोलापूर

**दक्षिण सोलापूर तालुक्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचा मंथन मेळावा १ डिसेंबरला आयोजित करण्यात आला असून तो ऐतिहासिक करण्याचा निर्धार पक्षाच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जाहीर केला. तालुका अध्यक्ष बिपीन करजोळे यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूरच्या शासकीय विश्रामगृहात बैठक पार पडली. त्यावेळी विविध निर्णय घेण्यात आले.**



या बैठकीला पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रा.सुभाष बिराजदार, प्रा.महेश माने, जिल्हा खजिनदार व प्रवक्ते डॉ.बसवराज बगले, माजी सभापती आप्पाराव कोरे, बाळासाहेब बंडगर, ज्येष्ठ नेते शिवानंद हिरेमठ, माजी तालुकाध्यक्ष सुभाष पाटील, प्रा.राज साळुंके, दक्षिण सोलापूरचे विधानसभा अध्यक्ष मुजीब शेख, कार्याध्यक्ष रियाज शेख, युवक अध्यक्ष संगमेश बगले, बळीदादा हेबळे हे प्रमुख पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

तालुक्यातील ज्या कार्यकर्त्यांनी ग्रामपंचायत आणि सोसायटी निवडणूकीत यश संपादन केले आहे.आणि अन्य पक्षातील बहुसंख्य नेते कार्यकर्ते राष्ट्रवादीत प्रवेश केले आहेत. अशा सर्वांचा सत्कार या मंथन मेळाव्यात करण्याचेही यावेळी ठरले. काही पदाधिकाऱ्यांकडून निष्ठावंत कार्यकर्त्यांकडे दूर्लक्ष होत असून गटबाजी केली जात असल्याच्या तक्रारी बैठकीत करण्यात आल्या त्यात सुधारणा करण्याच्या सूचना संबधितांना देण्यात आल्या.शिवाय पक्षशिस्त न पाळल्यास कारवाई करण्याची समज देण्यात आली.

राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पदाधिकाऱ्यांच्या प्रत्येक गावात विविध लोकोपयोगी उपक्रम राबविणे, तालुक्यात रोजगार मेळावा आयोजित करणे, कुंभारी येथे राष्ट्रवादीकडून आयोजित करण्यात आलेला सामुदायिक विवाह सोहळा यशस्वी करण्याचा मानस सर्वांनी व्यक्त केला. मंथन मेळाव्यातील सहभागाची दखल घेऊन लवकरच सर्व सेल आणि तालुका कार्यकारिणीत फेरबदल करण्याचा ठराव यावेळी संमत झाला. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीपूर्वी पदाधिकाऱ्यांकडून प्रत्येक गावात राष्ट्रवादीचे विविध उपक्रम आणि बैठक घेऊन लोकसहभाग वाढविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक सेलचे अध्यक्ष निंगोंडा तळे, युवती अध्यक्षा दिलखुष तांबोळी, ज्येष्ठ पदाधिकारी गौरीशंकर हादरे, श्रीकांत बगले, नांदणीचे सरपंच शिवानंद बंडे, सुभाष पवार, आण्णाराव कापसे, संजय पाटील, परमेश्वर सावंत, रतिलाल राठोड, महासिध्द गायकवाड, आमसिध्द कांबळे, प्रमोद गुंड, अरविंद कांबळे, शिवराज जाधव, सोमनाथ पाटील, विश्वनाथ कुमठेकर, मोहसीन फुलारी, सिध्दाराम गुरुदेहळी, माशप्पा कोळी, रवी होनराव, सातलिंग गंगदे, रफिक नदाफ, मिडीया सेलचे जिल्हाध्यक्ष मिलींद गोरे, तालुका अध्यक्ष अर्जुन वाघमारे, गिरमल गुरव, शंभूराजे भरले, घनश्याम किरगत, उमर काझी, राहूल जाधव, किशोर चौधरी आदी पदाधिकारी बैठकीत सहभागी झाले होते.



## मनोरमा मास्टर्स, सहारा रायडर्सचा विजय

सुराज्य/सोलापूर

सुपर ओव्हरमध्ये गेलेल्या सामन्यात मनोरमा मास्टर्सने अजिंक्यतारा चॅलेंजर्सवर मात केली. दुसऱ्या सामन्यात सहारा रायडर्सने विजय मिळविला. सोलापूर प्रीमिअर लीग महापौर चषक क्रिकेट स्पर्धेत शुक्रवारी पहिला सामना मनोरमा मास्टर्स आणि अजिंक्यतारा चॅलेंजर्स यांच्यात झाला.

प्रथम फलंदाजी करताना मनोरमा मास्टर्सने २० षटकांत ४ बाद १९१ धावा केल्या. कर्णधार समीर शेखने समीरने एका षटकात चार आणि पुढील षटकात दोन असे सहा चेंडूत सहा षट्कार मारत १०१ धावा केल्या. लक्ष्मण कांबळेने नाबाद ६६ धावा केल्या. अजिंक्यताराकडून लक्ष्मण गरडने दोन, रोहन ढेपेने आणि अमर कारंडे यांनी एक गडी बाद केला. प्रत्युत्तरात ईश्वर पतंगे ६२, प्रवीण देशेट्टी ४४ आणि संदीप राठोड ४५ धावा यांच्या फलंदाजीने अजिंक्यतारा संघाने २० षटकांत ८ बाद १९१ धावा केल्या. समान धावसंख्येमुळे हा सामना सुपरओव्हरमध्ये गेला. अजिंक्यतारा संघाने एका षटकात १ बाद १० धावा केल्या. प्रत्युत्तरात मनोरमा मास्टर्सनने १ बाद ११ धावा करत एका धावेने विजय मिळविला. समीर शेख यास सामनावीर' म्हणून गौरविण्यात आले. दुसरा सामना माऊली वॉरिअर्स आणि सहारा रायडर्स यांच्यात झाला. आदर्श भणूरने १८, लखन गावडेने २१ आणि विशाल मिसाळने १६ धावा केल्याने माऊली वॉरिअर्सचा डाव १०५ धावांत संपुष्टात आला.

सहाराच्या मुआज शेख, शुभम जानगवळी यांनी प्रत्येकी दोन तर वसीम सौदागरने तीन बळी घेतले.प्रत्युत्तरात १९.१ षटकात ८ गडी गमावत सहारा रायडर्सने ही धावसंख्या पूर्ण केली. झैद उस्तादने २४, मुआज शेखने १४, वसीम सौदागरने २५ धावा केल्या. माऊलीच्या कृष्णा पवारने तीन व प्रथम तानवडेने एक गडी बाद केला. सहाराने दोन गडी राखून विजय मिळविला. सामनावीर' म्हणून वसीम सौदागर यास गौरविण्यात आले.

## बार्शीत भव्य कीर्तन महोत्सव संपन्न

सुराज्य/बार्शी

येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात श्री भगवंत देवस्थान ट्रस्टच्या व महेश युवक संघाच्या सहकार्याने दि.२१ ते २५ नोव्हेंबर दरम्यान कीर्तन महोत्सव संपन्न झाला. या महोत्सवात राज्यातील नामवंत कीर्तनकार ह.भ.प. बालाजी बोराडे, मंगेश वराडे, गोविंद मलिक, तेजस्विनी पाठक, नवनीत करगणीकर, प्रवीण दुषिंग, नारायण पडुले, अमोल शास्त्री, नारायण शास्त्री, शिवलीला पाटील, चैतन्य राऊत, संग्राम भंडारे, एकनाथ भांबले, कांचन शेळके, रवि पिंपळगांवकर, उन्नती तांबे, विकास देवडे, छगन खडके, बाजीराव बांगर, प्रकाश साठे यांच्या रसाळ कीर्तनाचा आनंद बार्शीकरांना मिळाला. या कार्यक्रमासाठी देवस्थान समितीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.




### महार वतनदार परिषदेचा ९५ वा वर्षपूर्ती सोहळा

## संविधान दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

सुराज्य/सोलापूर

महार वतनदार ट्रस्ट थोरला राजवाडा व मिलिंद नगर बुधवार पेठ सोलापूर यांच्या वतीने २६ नोव्हेंबर २०२२ शनिवार रोजी संविधान दिना निमित्त संविधान वाचन सकाळी १० वा. शालेय विद्यार्थांच्या उपस्थित होणार असून, विद्यार्थांना संविधान दिन व संविधानाचे महत्त्व सांगून, विद्यार्थांना ऐतिहासिक पंचाच्या चावडीचा इतिहास व १९२७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या महार वतन परिषदेतील आठवणी तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभूमी ची माहिती समस्त महार वतनदार ट्रस्टच्या वतीने देण्यात येणार आहे.

२७ नोव्हेंबर रोजी महार वतन परिषदेच्या ९५ व्यां वर्षपूर्ती सोहळ्या निमित्त महार वतनदार परिषदेतील संवाद आणि आठवणींचा उजाळा या विषयावर व्याख्यान ठीक सायंकाळी ०६.०० वाजता होणार आहे, यावेळी प्रमुख वक्ते म्हणून प्राध्यापक डॉ एम.आर. कांबळे सर हे माहिती देणार असून, कार्यक्रमास तुषार ठोंबरे साहेब सोलापूर अप्पर जिल्हाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ट्रस्टी अध्यक्ष देविदास बाबरे, आंबेडकरी चळवळीतील नेते राजाभाऊ सरवदे, आंबेडकरी चळवळीतील सुभानजी बनसोडे, माजी उत्तर तहसीलदार बी.के, तळभंडारे, ज्येष्ठ वतनदार उत्तम आबुटे, नागनाथ सरवदे यांचं देखील मार्गदर्शन लाभणार आहे, सदर चे कार्यक्रम हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार, मिलिंद नगर बुधवार पेठ, येथे पार पडणार आहेत. शहरातील नागरिकांना आग्रहाचे निमंत्रण आहे की त्यांनी सदर वैचारिक मेजवानीचा आस्वाद घ्यावा असे आव्हान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले. पत्रकार परिषददेस देविदास बाबरे, सुशील सरवदे, बाबरे, अतिश बनसोडे, शशिकांत तळमोहिते, शिवम ताळभंडारे उपस्थित होते.

# जनता आणि पोलीस यांच्यातील समन्वय कौतुकास्पद

## वळसंग पोलीस ठाणे नूतनीकरणाप्रसंगी विशेष पोलीस महानिरीक्षक लोहिया यांचे प्रतिपादन

**अक्कलकोट** : वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या पुढाकाराने वळसंग पोलीस ठाणे येथे जनता आणि पोलीस यांच्या समन्वयातून झालेली हे विविध विकास कामे निश्चितच कौतुकास्पद बाब आहे तसेच वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीत मियावा की जंगल बनवून पक्षांना देखील हक्काचे घर प्राप्त झाल्याचा आनंद व्यक्त करत अशाच पद्धतीचे अन्य पोलीस ठाण्यामध्ये देखील करण्याचे अपेक्षा यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया यांनी व्यक्त केले.



बुधवारी वार्षिक तपासणी अनुषंगाने कोल्हापूर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया यांनी वळसंग पोलीस ठाणे येथे भेट दिली. त्याचे निमित्त साधून वळसंग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या पुढाकाराने वळसंग पोलीस ठाणे परिसरात झालेले ऑक्सिजन पार्क ,वॉकिंग ट्रॅक, हॉलीबॉल ग्राऊंड, मियावा कि जंगल, वनभोजन कट्टा ,ओपन जिम, विहीर पुनर्जीवन, गुन्हे अभिलेख व शस्त्रागार सुशोभीकरण ,रेन वॉटर हार्वेस्टिंग, तारेचे कंपाउंड, लोखंडी प्रवेश गेट, प्रवेश कमान, मंदिर सुशोभीकरण, माझे गाव माजी सुरक्षा अंतर्गत सीसीटीव्ही कॅमेरा व सायरन, पार्क साऊंड पोल अशा विविध विकास कामांचे उद्घाटन विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया यांच्या हस्ते पार पडले. त्यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया बोलत होते. सदर कार्यक्रमाच्या वेळेस सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे,सोलापूर ग्रामीण अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र सिंह गौर, वळसंग पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अतुल भोसले आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी बोलताना वळसंग पोलीस ठाणे येथे झालेले काम हे चांगले असून त्यामुळे पोलीस ठाण्याचे रूपडे पालटण्यास मदत झालेली आहे. सदर कार्यक्रमाच्या वेळी सामाजिक उत्तरदायित्व फंडातून झुआरी सिमेंट कंपनीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविल्याने झुआरी सिमेंट कंपनीचे मुख्य व्यवस्थापक दीपक कक्कड यांचा विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी दक्षिण सोलापूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता यमुलकर, त्याचबरोबर एनटीपीसी होटगी चे रेड्डी ,अल्ट्राटेक सिमेंट कंपनी होटगीचे महादेव बाळगी, चेट्टी नाड सिमेंट कंपनी आऊसचे श्रीनिवास तसेच वळसंगचे सरपंच महानंदा दुधगी यांचे देखील या निमित्ताने सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमानंतर वळसंग पोलीस ठाण्याचे वार्षिक तपासणी चे काम झाले. सदर कार्यक्रम चे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन वळसंगचे माजी सरपंच महादेव होटकर यांनी केले.



## द ग्रीनफिंगर्स स्कूलची जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी

सुराज्य/अकलूज : सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेत द ग्रीन फिंगर्स स्कूलने अंतिम सामन्यात अरिहंत पब्लिक स्कूलचा ७-० असा पराभव केला. अंतिम सामन्यात अनुज जगताप ३, विशाल खटके व निशांत देसाई याने प्रत्येकी २ गोल करीत विजायामध्ये मोलाचा वाटा उचलला. सोलापूर येथे होणाऱ्या विभागीय फुटबॉल स्पर्धेसाठी द ग्रीन फिंगर्स स्कूलची निवड झाली.

संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष रणजीतसिंह मोहिते पाटील, वरिष्ठ विश्वस्त सत्यप्रभादेवी मोहिते पाटील, सचिव धैर्यशील मोहिते पाटील, स्कूलचे चेअरमन नितीन महादेवराव इंगवले देशमुख व मुख्याध्यापक उमाकांत बराल यांनी पुढील वाटचालीस शुभेच्या दिल्या. सर्व खेळाडूस क्रीडा प्रमुख शिकारे उमेश व फुटबॉल प्रशिक्षक पृथ्वीराज पराडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



## तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत चारही संघांची जिल्हास्तरावर निवड

सुराज्य/सोलापूर : तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत बार्शीतील महाराष्ट्र विद्यालयाच्या वयोगट १४ व १७ वर्षे मुलांचा व मुलींचा अशा ४ संघांनी प्रथम क्रमांक पटकावला. या संघांची जिल्हास्तरावर निवड झाली. दि. २१ व २२ नोव्हेंबर रोजी येथील महाराष्ट्र विद्यालयात १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील मुले व मुलींच्या शालेय तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर स्पर्धेमध्ये तालुक्यातील १६ संघांनी सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र विद्यालयाच्या वयोगट १४ व १७ वर्षे मुलांचा व मुलींचा एकूण ४ संघांनी प्रथम क्रमांक पटकावून जिल्हास्तरावर त्या संघांची निवड झाली. या तालुकास्तरीय स्पर्धेसाठी तालुक्यातील विविध शाळांतील व्हॉलीबॉल संघांनी सहभाग घेतला प्रा. डॉ. सुरेश लांडगे व प्रा. दीपक गुंड यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच क्रीडा शिक्षक पी. डी. पाटील, शिवराज बारंगुळे, आदित्य माने (राष्ट्रीय खेळाडू), अनिल पाटील, योगेश उपळकर यांचे देखील मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल सर्व संघाचे संस्थेचे अध्यक्ष बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, सर्व कार्यकारिणी सदस्य, सर्व संस्था सदस्य, महाराष्ट्र विद्यालयाचे प्राचार्य जी. ए. चव्हाण, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## ग्रीलमधून हात घालून कपाटातील तीन तोळे सोने लांबवले

वैराग : स्वयंपाक घराच्या दरवाजाचे ग्रील मधून हात घालून लॉक काढत घरामध्ये चोरट्यांनी प्रवेश करून कपाटातील तीन तोळे सोने लांबवल्याची घटना वैराग येथे बुधवारी पहाटे घडली असून याप्रकरणी अज्ञात चोरट्याच्या विरोधात वैराग पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंदवण्यात आला आहे..... याबाबत वैराग पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, पेशानी शिक्षक असलेले सुजित महादेव क्षीरसागर हे आपल्या सेवानिवृत्त शिक्षक आई-वडिलांसह वैराग मधील घोंगडे नगर मध्ये राहतात. दरम्यान मंगळवारी रात्री नेहमीप्रमाणे जेवणखाण करून सर्वजण आपापल्या खोलीमध्ये झोपले होते.झोपताना रूम मधील दरवाजांना सेफ्टी लॉक आणि साधा लॉक ही लावला होता, मात्र चोरट्यांनी ग्रील मधून हात घालत स्वयंपाक घराचा दरवाजा उघडला आणि घरामध्ये प्रवेश करून लाकडी दरवाजा कटावणीने उघडून कपाटातील २५ वर्षांपूर्वीचे अडीच तोळ्याचे सोन्याचे गंठण आणि अर्धा तोळ्याची सोन्याची अंगठी असा एकत्रित सुमारे तीन तोळे सोन्याचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला आहे. याप्रकरणी वैराग पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल सदाशिव गवळी हे करीत आहेत.

# फोरजी नेटवर्क आणि टू जी मशीन, स्वस्त धान्य वितरणात येताहेत अडचणी

### ऑफलाईन धान्य वाटप करण्याची स. म. शंकरराव मोहिते-पाटील रास्त भाव धान्य दुकानदार संघटनेची मागणी

सुराज्य/अकलूज

**फोरजी नेटवर्क आणि टूजी मशीन असल्याकारणाने माळशिरस तालुक्यातील स्वस्त धान्य वितरणात अडचणी येत आहेत. त्यामुळे अनेक लाभधारकांवर उपासमारीची वेळ आली असून धान्य असून वितरित करता येत नाही. अशी अडचण धान्य दुकानदारांची झाली आहे यामुळे ऑफलाईन धान्य वाटप करण्याची सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील रास्त भाव धान्य दुकानदार संघटनेने मागणी केली होती.**



मागील महिन्यापासून मशीन नीट चालत नाहीत फोरजी नेटवर्क व टूजी मशीन यामुळे मशीन नीट चालत नाहीत रेशनकार्ड धारकांना धान्य मिळेना व धान्य घेण्यासाठी मोलमजुरी सोडून वारंवार धान्यासाठी हेलपाटे मारावे लागत आहेत. यामुळे रेशनकार्डधारक धान्य मिळण्यापासून वंचित आहेत व सर्व दुकानापुढे लांबच लांब लोकांच्या रांगा प्रत्येक रेशनिंग दुकानापुढे लागतानाचे चित्र दिसत आहे.

ऐन निवडणूक काळामध्ये धान्यवाटप कसे करावे असा प्रश्न रेशन दुकानदारांपुढे पडला आहे. यामुळे विनाकारण तक्रारही होऊ लागल्या आहेत.धान्य दुकानात उपलब्ध असूनही धान्य वाटप करता येईना. यामुळे रेशनकार्डधारकांवर उपासमारीची वेळ आली आहे व नाहक त्रास दुकानदारांना सहन करावा लागत आहे. धान्यासाठी हेलपाटे मारावे किती व धान्य मिळणार कधी या प्रतीक्षेमध्ये ग्राहक बसले आहेत. दुकानदार व ग्राहक यांच्यामध्ये नाहक वादविवाद होत आहेत. त्यातच नेटवर्कचा सातत्याने खोळंबा होत असतो. त्यासाठी धान्य दुकानदारांकडून ऑफलाईन धान्यवाटप करण्याची मागणी सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील रास्त भाव धान्य दुकानदार संघटनेच्यावतीने निवासी नायब तहसीलदार तुषार देशमुख यांच्याकडे करण्यात आली आहे.

यावेळी धान्य दुकानदार संघटनेचे तालुकाअध्यक्ष विजय मंडलीक, उपाध्यक्ष दयानंद शेळके, ज्येष्ठ दुकानदार कुलकर्णी काका, वसंत जाधव, पाठक काका, श्रीराम जाधव, अफसर बागवान, संजय खराडे, युवराज माने देशमुख, रणजितसिंह भगत, ढोबळे दुकानदार, शिवाजी लोखंडे, अक्षय मिले असे बहुतांश दुकानदार उपस्थित होते.

> फोरजी नेटवर्क व टूजी मशीन असल्याकारणाने मशीन नीट चालत नाहीत. परिणामी रेशन दुकानदार हे सकाळी ८ वाजल्यापासून रात्री ९ वाजेपर्यंत दुकाने चालू ठेवताहेत. तरीही काही उपयोग होत नाही. निवडणूक काळ असल्याने प्रशासनाने ही या कडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे झाले आहे. अन्यथा दुकानदारांपुढे दुकान बंद ठेवणे व संपावर जाणे याशिवाय पर्याय नाही. यासाठी तात्काळ ऑफलाईन धान्य वितरण करण्याची परवानगी द्यावी.
>
> **- विजय मंडलीक,**
> तालुका अध्यक्ष, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील रास्त भाव धान्य दुकानदार संघटना.

## मंगळवेढ्यात दोन तरूणांनी घेतला गळफास

सुराज्य/मंगळवेढा: मंगळवेढा शहरातील समाधान खंदारे (वय ३२) व जित्ती येथील सिताराम भोसले (वय २०) या दोघा तरूणांनी गळफास घेवून आत्महत्या केली असल्याची घटना घडली असून या घटनेची मंगळवेढा पोलिसात अकस्मात मयत अशी नोंद झालेली आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी की, पहिल्या घटनेत शहरातील साठे नगर येथील समाधान खंदारे याने दि. २४ रोजी सकाळी ९.४५ च्या दरम्यान एमआयडीसी परिसरात वायसन्स इंडस्ट्रीजच्या बाजूला रोडच्या कडेला जंगली झाडाला सुताच्या दोरीने अज्ञात कारणावरून गळफास घेवून आत्महत्या केली.

दरम्यान पोलिसांनी त्यांचा व्हिसेरा राखून ठेवला आहे.दुसऱ्या घटनेत जित्ती येथील सिताराम भोसले याने दि. २४ रोजी सकाळी ११ वा. राहत्या घरामध्ये पत्र्याच्या अँगलला दारूच्या नशेत लुंगीच्या सहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केली आहे. पोलिसांनी याचाही व्हिसेरा राखून ठेवला आहे.

## मनसे कार्यकर्त्यांनी कर्नाटक मुख्यमंत्र्यांच्या प्रतिमेला मारले जोडे

सुराज्य/सोलापूर

**महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील ४० गावे कर्नाटकात सामील होतील, असा दावा कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मईंनी केला. याशिवाय सोलापूर आणि अक्कलकोटही कर्नाटकात नेऊ, असेही त्यांनी म्हटले आहे. या निषेधार्थ मनसेचे बोम्मई यांच्या विरोधात आंदोलन करत त्यांच्या प्रतिमेस जोडे मारले.**

सोलापुरात चार हुतात्मा स्मारकासमोर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने कर्नाटक मुख्यमंत्र्यांच्या प्रतिमेला जोडेमार आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे, जिल्हा उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, अभी रंपुरे, गोविंद बंदपट्टे यांच्यासह कार्यकर्ते सहभागी होते.

यावेळी कर्नाटक मुख्यमंत्र्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. सोलापुरात सर्व भाषिक लोक गुण्यागोविंदाने राहत आहेत. त्यामुळे सोलापूरकडे कोणी वाकड्या नजरेने बघू नये, अन्यथा बंगळुरूमध्ये येऊन आंदोलन करू, असा इशारा जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर यांनी दिला. यावेळी पोलीस परवानगी विना आंदोलन केल्याने मनसे कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये झटापट झाली.




## दोन खासगी इसमांची जामिनावर मुक्तता

सुराज्य/सोलापूर

पोलीस निरीक्षक आमच्या ओळखीचे आहेत, असे सांगून व भासवून महिला तक्रारदाराकडून दीड लाख रुपये लाचेची मागणी करणाऱ्या दोघां खाजगी इसमांची विशेष जिल्हा सत्र व न्यायाधीश आर. एन. पांढरे यांनी जामिनावर मुक्तता केली.

पोलीस निरीक्षकाच्या नावे आरोपींकडून रक्कम दिड लाख रूपये लाचेची मागणी केली गेल्याचे निष्पन्न झाल्यानंतर आरोपींच्याविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाणे येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. या प्रकरणात सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.एन.पांढरे यांनी आरोपी युवराज राठोड व साजन हावळे यांना प्रत्येकी रक्कम रुपये ३० हजारच्या जामिनावर मुक्त केले.

यात आरोपी युवराज भीमराव राठोड व साजन रमेश हावळे यांच्या वतीने ॲड.निलेश जोशी, ॲड. यशश्री जोशी, ॲड.मल्लिनाथ बिराजदार, ॲड.राणी गाजूल,ॲड. ओंकार परदेशी,ॲड.सोनाली कोंडा,ॲड.लता कॅमकोंडा यांनी तर सरकार पक्षातर्फे क्यातम यांनी काम पाहिले.

## स्व. अनुराधा ढोबळे यांच्या जयंतीनिमित्त अनुसंध्या कार्यक्रम

सुराज्य/मंगळवेढा

माजी मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांच्या पत्नी स्व. अनुराधा ढोबळेयांच्या जयंतीनिमित्त मंगळवार, २९ रोजी शाहू शिक्षणसंस्था, सावली फाऊंडेशन आणि बहुजन रयत परिषद यांच्या संयुक्तविद्यमाने 'अनुसंध्या' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यावेळी महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार ह.भ.प. चैतन्य महाराज वाडेकर-आळंदीकर यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शाहू शिक्षण संस्थेच्या विश्वस्त कोमलसाळुंखे यांनी शिशुविहार येथे पत्रकारांना दिली.

सदर कीर्तनाचा कार्यक्रम शाहू मैदान, शिशु विहार समोर, मंगळवेढा येथे आयोजिला असून, सायंकाळी ६ वाजता कीर्तन सुरू होणार आहे. खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, खासदार डॉ. जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामी, खासदार धनंजय महाडिक यांच्या हस्ते आणि माजीमंत्री आमदार विजयकुमारदेशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

याच कार्यक्रमात मंगळवेढ्याच्या माजी नगराध्यक्षा अरुणा माळी व डीवायएसपी राजश्री पाटील यांच्या हस्ते ४१ महाराजांचा सत्कार करण्यात येणार आहे.

कीर्तनप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन शाहू शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अब्राहम आवळे, महात्मा फुलेसूत गिरणीचे चेअरमन अभिजित ढोबळे, संस्थेच्या विश्वस्त क्रांती आवळे, अजय साळुंखे यांनी केले.

## फिनिक्स पोदार स्कूलचे क्रीडा स्पर्धेत यश

सुराज्य/बार्शी



क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धामध्ये बार्शीतील फिनिक्स पोदार लर्न स्कूलच्या विद्यार्थांनी विविध क्रीडा प्रकारामध्ये उज्वल यश मिळवले. श्री दुर्गामाता कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ विजयदुर्ग येथील आंतरराष्ट्रीय सागरी जलतरण स्पर्धेमध्येही विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र विद्यालय बार्शी येथे आयोजित झालेल्या हॉलीबॉल या क्रीडा स्पर्धेमध्ये १४ वर्षाखालील वयोगटात मुले व मुली यांनी उपविजेतेपद पटकावले. स्केटिंग-सेंट जोसेफ बार्शी या ठिकाणी आयोजित झालेल्या स्पीड स्केटिंग चॅम्पियनशिपमध्ये ११ वर्षाखालील वयोगटात आर्यन आनंद शिंदे याने प्रथम क्रमांक तर सोहम दिपक सावंत याने चौथा क्रमांक पटकावला. तसेच १४ वर्षाखालील वयोगटात द्वारकेश ऋषिकेश झरेगावकर याने चौथा क्रमांक पटकावला.

जलतरण- विजयदुर्ग येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय सागरी जलतरण स्पर्धेमध्ये तन्वी प्रदीप नवले हिने तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळवले. सिकई मार्शल आर्ट या जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये विराज राहुल जाधव याने द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळवले.या स्पर्धांसाठी शिक्षक म्हणून क्रीडा शिक्षक विजय ढगे, प्रियंका येडलवार, तानाजी अंकुशे, अमृता सावळे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

## — जाहीर समन्स —

**मा.उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा)**
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप.असोसिएशन लि., सोलापूर
११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखेशेजारी,
सोलापूर - ०१

**मनोरमा को.ऑप.बँक लि.सोलापूर** ... **अर्जदार**

**- विरुद्ध -**

(खालील तपशिलातील नमुद केलेल थकबाकीदार सभासद) ... **जाब देणार**

| अ.क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १. | २४२/२०-२१ | ३१८७३०/- | ४ | परमेश्वर गोविंद पोळ मु.पो.२५१२, फंड गल्ली करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर |
| २. | ३०१/२०-२१ | ३७३६९८५/- | १ | काशिनाथ बसप्पा प्रचंडे मु.पो.आंदेवाडी (बु). ता.अक्कलकोट, जि.सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

***उपनिर्दीष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वत: जातीने वार गुरुवार दि.०८/१२/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.***

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

***आज दि.२४/११/२०२२ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.***

शिक्का


सही/-
उपनिबंधक
सहकारी संस्था (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी
बँक्स् को.ऑप.असोसिएशन लि. सोलापूर

# नव्या शैक्षणिक धोरणांमुळे प्राध्यापकांच्या नोकरीवर गदा येणार नाही

### राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आश्वासन

### संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफताना

सुराज्य/पुणे




नवीन शैक्षणिक धोरण मानवाला परिपूर्ण करणारे असून जगातील सर्व विद्यापीठाशी करार करण्याचे कार्य सुरू आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयांना नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यात येईल. चार वर्षांची पदवी व अभ्यासक्रम सुरू करण्यात येईल. तसेच या बदलामुळे प्राध्यापकांच्या नोकरीवर गदा येणार नाही, असे आश्वासन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत आणि संतश्री ज्ञानेश्वर-संतश्री तुकाराम महाराज स्मृती व्याख्यानमाला न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने युनेस्को अध्यासना अंतर्गत आयोजित २७वी तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमालेत 'राष्ट्रीय शिक्षण धोरण' या विषयावर आयोजित दुसरे पुष्प गुंफताना प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी प्रा. डॉ. मोहन केशव फडके हे सन्माननीय पाहुणे होते. अध्यक्षस्थानी विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणेचे संस्थापक अध्यक्ष व युनेस्को अध्यासनाचे प्रमुख प्रा. डॉ. विश्वनाथ कराड होते. तसेच एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्यकारी अध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस, डॉ. प्रसाद खांडेकर व प्रा. दत्ता दंडगे उपस्थित होते.


प्रा. डॉ. विश्वनाथ कराड म्हणाले, 'देव ही शक्ती आहे, व्यक्ती नाही. शिक्षणाच्या माध्यमातूनच मानव व जगाला दिशा दाखविता येईल. तसेच जीवनातील सर्व गोष्टींचा अनुभव घेण्यासाठी आध्यात्माला समजून घेणे आवश्यक आहे. ज्ञानेश्वरांचे सर्व सिध्दांत मानवजातीच्या कल्याणासाठी आहे. अध्यात्म एक शास्त्र ते अंधश्रध्दा नाही. जगाला नवी दिशा देण्यासाठी नवीन शिक्षण पध्दत गरजेची आहे.

यावेळी प्रा. डॉ. आर. एम. चिटणीस यांनी स्वागत पर भाषण केले. प्रा. डॉ. प्रसाद खांडेकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अतुल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. दत्ता दंडगे यांनी आभार मानले.

# कर्नाटकबाबत अक्कलकोटकरांमध्ये तीव्र प्रतिक्रिया

सुराज्य/अक्कलकोट

**कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई तीर्थक्षेत्र अक्कलकोट व सोलापूर बाबत केलेल्या व्टिटबाबत अक्कलकोटकरांनी तीव्र तिखट प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली आहे. नवू कन्नड भाषिक ईद्यऊ आदरे नमग महाराष्ट्रनागे इरादू आद', नवू महाराष्ट्रानागे हुट्टीदरे नम्म सावू महाराष्ट्रदागे आगे बेकू' नम्मगे कर्नाटकदाग होगावू इच्छे इल्ला. कर्नाटक राज्यात सोलापूरसह अक्कलकोट तालुका मागण्याचा कोणी विचार केल्यास आम्ही प्राणपणाने विरोध करु, अशी तीव्र प्रतिक्रिया अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी शहरासह तालुक्यातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.**




दरम्यान महाराष्ट्रातल्या सांगली जिल्ह्यातल्या ४० गावांवर दावा करणार असल्याचे वक्तव्य कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी केले आहे. त्यामुळे नवा वाद पेटला. दुसरीकडे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आम्ही एकही गाव देणार नाही. उलट बेळगाव, कारवार, निपाणी मिळवण्यासाठी प्रयत्न करू, असे सडेतोड उत्तर दिले आहे. याबरोबर सदर वादाची ठिणगी ही केंद्र सरकार सूचविल्याप्रमाणे कर्नाटक व महाराष्ट्र सीमावादाची जिल्हाधिकाऱ्यांची बैठकीनंतर सीमावाद हा उफाळून निघाला. त्यानंतर कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्र्यांकडून महाराष्ट्र राज्यातील जिल्हा व तालुका व्टिटच्या माध्यमातून वक्तव्य केले. त्यामुळे सध्या महाराष्ट्रातील सीमाभागात कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्या विरोधात तीव्र प्रतिक्रियाची राळ उठत आहे.

याबाबत राज्याचे मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उमपुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी अक्कलकोट तालुक्यातील गावावर दावा सांगणारे कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्या वक्तव्य निंदनीय असल्याचे सांगितले.

कर्नाटक मुख्यमंत्र्याचे वक्तव्याचे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी, नेते मंडळींनी, सर्व समाज घटकांनी आणि सामान्य व्यापारी, शेतकरी मजूर कामगार नोकरदार, डॉक्टर, वकील आदी सर्व व्यवसायिकांनी एक मुखाने कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांचा निषेध केला युवकांनी एकत्र येत शहराचा मध्यवर्ती भाग असलेल्या कारंजा चौकामध्ये बोम्मई यांच्या विरोधामध्ये जोरदार घोषणाबाजी केली. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा जयघोष केला कोणत्याही परिस्थितीत आम्ही कर्नाटकात जाणार नाही असा निर्धार व्यक्त केला.व राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्यावतीने राजा छत्रपती शिवाजी महाराज चौक बसस्थानक येथे मुख्यमंत्री बोम्मई यांच्या प्रतिमेला जोडेमारो आंदोलन करण्यात आले. अक्कलकोट, सोलापूर बाबत कर्नाटक मुख्यमंत्री बोम्मई यांनी केलेल्या वक्तव्याबाबत विविध पक्ष, सामाजिक संघटना, पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी तिखट प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.



अक्कलकोट तालुक्यातून तिखट प्रतिक्रिया व्यक्त करताना भाजपा जिल्हाध्यक्ष, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी कन्नडमध्ये प्रतिक्रिया देताना म्हणाले, आम्ही कन्नड बोलतो, मात्र आमचा जन्म महाराष्ट्रामध्ये झाला असून महाराष्ट्राच्या मातीतच आमचे मरण आहे. आमचे पूर्वज आणि आगामी पिढी हे महाराष्ट्रातच राहणार असून कर्नाटकमध्ये घेण्याचे प्रयत्न करु नये त्यांचे प्रयत्न कदापि साध्य होणार नसून, तसेच अक्कलकोट - सोलापूर हा महाराष्ट्राचा अविभाज्य घटक आहे.अक्कलकोट वासिय किंवा सोलापूर वासिय कधी ही कर्नाटकात जायची भाषा कोणीही कधीही केली नाही.या महाराष्ट्राच्या माती सोबत आमची नाळ जोडलेली आहे. अक्कलकोट आणी सोलापूर हे कायमस्वरूपी महाराष्ट्रात च राहतील. असा खणखणीत इशारा देत असतानाच सीमा प्रश्नावर सामंजस्याची भूमिका हवी असे मत नोंदवत आम्ही महाराष्ट्रात जन्मलो आणि महाराष्ट्रातच मरणार आमचा महाराष्ट्र माझा मी महाराष्ट्राचा असे स्पष्टीकरण आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.



अक्कलकोट तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यातील एकाही व्यक्तीची कर्नाटक राज्यात जाण्याची इच्छा नाही. सध्या तिसरी पिढी चालु आहे. आमच्या पहिल्या पिढीची कुणाचीही कर्नाटक राज्यात जाण्याची इच्छा नव्हती. आता असलेल्या तिसऱ्या पिढीचीही कर्नाटक राज्यात जाण्याची मुळीच इच्छा नाही. कर्नाटक राज्यात तसेच महाराष्ट्रात व केंद्राही भाजपाचेच सरकार असल्याने एकत्रित बसून चर्चेव्दारे महाराष्ट्र-कर्नाटक सिमावाद सोडविण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. बेळगाव व निपाणी भागातील लोकांची काय मागणी आहे. त्या जनतेची काय इच्छा आहे, त्याप्रमाणे मार्ग काढण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत, अशी प्रतिक्रिया माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी दिली.



माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांनी कडाडून टीका करत महाराष्ट्र माझा-मी महाराष्ट्राचा यात महाराष्ट्रापासून आम्हाला कोणीही हिरावून घेण्याचा प्रयत्न केला तर आम्ही कदापीही सहन करणार नाही, महाराष्ट्रातील एकही गाव कर्नाटक राज्यात विलीन होणार नाही. उगाचच सीमावाद न वाढविता यास पुर्णविराम मिळायला हवा. अशी आक्रमक प्रतिक्रिया दिली.



काँग्रेसचे तालुका अध्यक्ष शंकर म्हेत्रे बोलताना म्हणाले,अक्कलकोट तालुका कदापि कर्नाटकामध्ये जाणार नाही. तो घेण्यासाठी कर्नाटक सरकारने कधीही प्रयत्न करु नये.आमच्यासाठी अक्कलकोट, सोलापूर, महाराष्ट्र जिना यहां, मरना यहां' असे आहे. जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष आणि अक्कलकोट नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष अशपाक बळोरगी म्हणाले,महाजन कमिशन अक्कलकोटला आले तेव्हा माझे वडील कै. मुस्तफा बळोरगी हे नगराध्यक्ष होते त्यांनी त्यावेळीच अक्कलकोट महाराष्ट्रात राहील हे महाजन कमिशन ला बजावून सांगितले होते ती भूमिका आजही आमची आज ही कायमच आहे आम्ही महाराष्ट्राची एक इंचही भूमी देणार नाही.



शिंदे गट - शिवसेना तालुका प्रमुख संजय देशमुख म्हणाले, अक्कलकोट तालुक्यातील एक इंच देखील जमीन कर्नाटक राज्यामध्ये जावू देणार नाही, असा खणखणीत रोखठोक इशारा देशमुख यांनी दिला. ज्येष्ठ पत्रकार बाबासाहेब निंबाळकर यांनी मराठी भाषा ही आई तर कन्नड भाषा ही मावशी आहे. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी अक्कलकोटबाबत बाष्कळ वक्तव्य करु नये.



दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रथमेश म्हेत्रे यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई यांनी सीमावादा सारखा प्रश्न काढुन सामाजिक तेढ निर्माण करणे चुकीचे आहे.अक्कलकोट, सोलापूरची इंच जमीन कर्नाटकला देणार नसल्याचे सांगितले.



काँग्रेसचे महिला तालुका अध्यक्षा शितलताई म्हेत्रे यांनी म्हणाल्या आमच्या सीमा भागामध्ये मराठ्यांनी कन्नड आई आणि मावशी प्रमाणे गुण्यागोविंदाने राहत आहेत ही आमची कर्मभूमी आहे आम्ही महाराष्ट्राशी एकनिष्ठ आहोत.

**रिपाइं तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे** यांनी सीमावाद प्रश्न प्रकरणी कर्नाटक मुख्यमंत्र्यांनीवाद उफाळू नये अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरू असा गंभीर इशारा दिला आहे.

**रासपचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुनिल बंडगर** यांनी अक्कलकोट तालुका सोलापूर कदापिही कर्नाटकमध्ये जावू देणार नाही. याकरिता रस्त्यावर उतरण्याचा इशारा बंडगर यांनी दिला.

**भाजपाचे नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी** यांनी कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्याचा जोरदार निषेध केला ते म्हणाले महाराष्ट्रामध्ये कुठल्याही कन्नड माणसावर अन्याय झाला नाही पण कर्नाटक मध्ये मात्र मराठी माणसावर अन्याय चालू आहे बेळगाव कारवार निपाणी सह तो भाग आमचा आहे आम्ही तर अक्कलकोट आणि सोलापूर देणारच नाही पण तो भाग घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.

**मुस्लीम समाजाचे अध्यक्ष एजाज मुतवल्ली** यांनी सर्व जाती धर्माचे लोक गुण्या गोविंदाने सोलापूर अक्कलकोट मध्ये राहत असताना सीमा वादासारखा प्रश्न उपस्थित करुन सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**लहुजी शक्ती सेना कोअर कमिटी जिल्हाध्यक्ष वसंतराव देडे** यांनी म्हणाले, मुख्यमंत्री बोम्मई यांनी आगामी कर्नाटक राज्यातील निवडणूकीचे पहावे उगाच सीमावादाच प्रश्न उपस्थित करुन राज्या-राज्यात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करु नये.

**ज्येष्ठ समाजसेवक शिवनिंगप्पा वंगे** म्हणाले हा शिवरायांचा महाराष्ट्र आहे आणि त्या महाराष्ट्रामध्ये आम्ही आहोत याचा आम्हाला अभिमान आहे प्राण गेला तरी बेहत्तर पण आम्ही महाराष्ट्र सोडणार नाही.

**राष्टवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष दिलीप सिध्दे** यांनी कर्नाटक मुख्यमंत्री यांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध केला पहिल्यांदा आपला कर्नाटक सांभाळा नंतर महाराष्ट्राची गोष्ट करा महाराष्ट्र इतके प्रगत राज्य करा आणि मग महाराष्ट्रातील गावे मागा असा सल्ला दिला.

**डॉ.विजय हर्डीकर** यांनी कर्नाटकच्या मुख्यमंत्र्याचे वक्तव्य अजब असल्याचे सांगितले महाजन कमिशन हे महाराष्ट्र शासनाने तेव्हाच फेटाळून लावले आहे ज्या गोष्टीला नकार दिला त्या गोष्टी उकरून काढणे योग्य नाही.


**भाजपा शहर अध्यक्ष शिवशरण जोजन** यांनी महाराष्ट्रातील एकही गाव कर्नाटक राज्यात विलीन होणार नाही. उगाचच सीमावाद न वाढविता यास पुर्णविराम मिळायला हवा.

**राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते स्वामीनाथ चौगुले** यांनी मुंबईच्या वक्तव्याचा निषेध करून दोन्हीकडे भाजपचे राज्य आहे यांना बेकारी शेतीचे प्रश्न यावरून जनसामान्यांचे लक्ष विचलित करण्यासाठी हे नाटक चालू केले आहे असे प्रतिपादन केले.



## विरवडे बु. मध्ये आयुष्यमान भारत कार्ड शिबिराचे आयोजन

**विरवडे** : मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भाजपा युवा मोर्चाचे उपाध्यक्ष तथा मोहोळ कृ.उ.बा. समितीचे संचालक अंकुश आवताडे यांनी मोहोळ तालुक्यातील विरवडे बु. येथे आयुष्यमान भारत कार्ड शिबिर आयोजित केले होते. यावेळी भिमाचे नूतन व्हा चेअरमन सतीश (अण्णा) जगताप, मंगळवेढा कृ.उ.बा. समितीचे सभापती सोमनाथ आवताडे, भाजपचे जिल्हा संघटक सरचिटणीस शशिकांत चव्हाण, मोहोळ नगरसेवक तथा भाजपा शहराध्यक्ष सुशील (भैय्या) क्षीरसागर, माजी सरपंच विठ्ठल माळी, जयसिंग (नाना) आवताडे, साहेबराव गुंड-पाटील, दगडू अवताडे, भाऊराव पाटील, ज्ञानेश्वर पाटील, दिनकर पवार, शाहू अवताडे, घनश्याम पाटील, प्रकाश आवताडे, रमेश आवताडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरात १५१ ग्रामस्थांनी सहभाग नोंदवून आयुष्यमान भारत कार्ड काढून घेतले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवा उद्योजक लहू आवताडे, मसुदेव आवताडे, शाहू आवताडे, काकासाहेब आवताडे, संतोष आवताडे, समाधान आवताडे यांनी परिश्रम घेतले.



## धर्माचे आचारण करण्याचे शिवाचार्य यांचे आवाहन

**नाझरे:** वीरशैव बांधवांनी कपाळी भस्म गळयात लिंग घालून धर्माचे आचरण करणे गरजेचे आहे म्हणजे वीरभद्राची कृपा राहील व ईश्वराने मानव जन्म दिला म्हणजे तो प्रसादच आहे व शिवाला फक्त तुमच्याकडून नामस्मरण पाहिजे व त्यासाठी बालवयातच संस्कार गरजेचे आहेत तसेच प्रत्येकाने आई-वडील गुरु लिंग व जंगम यांची सेवा करा फलप्राप्ती होईल असे श्रीगुरु महादया रविशंकर शिवाचार्य रायपाटणकर महाराज यांनी जयंती उत्सव सोहळयात विरभद्र मंदिर नाझरे ता सांगोला येथे सांगितले. देव आपल्या हृदयात आहे हे समजून शिवाची व वीरभद्राची आराधना करा व स्वधर्माने वागा जीवनात सुख शांती व समाधान लाभेल असे कोळेकर महास्वामीजी यांनी सांगितले व गुरुमठ पहा व धर्माची व्याप्ती वाढवा असेही महास्वामींनी सांगितले तसेच श्रींच्या पालखींची मिरवणूक रायपाटणकर महाराज यांच्या समवेत व वीरशैव महिला भजनी मंडळ व हुलजंती स्वामी त्यांचे सर्व भक्तगण यांनी मिरवणुकीची शोभा वाढवली यावेळी सर्व स्वामी जंगम व वीरशैव बांधव महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या शेवटी महाआरती व पट्टणशेट्टी जत जि सांगली यांचा महाप्रसाद वाटप करण्यात आला.

## पटवर्धन-कुरोली ते शेवते रस्त्याचे काम निकृष्ठ दर्जाचे

सुराज्य/पंढरपूर



बांधकाम विभागाचे कर्मचारी कामावर स्वत: उपस्थित असतात. ठिकठिकाणी नियमाप्रमाणे डांबरीकरण करण्यात येत आहे. मात्र लगेच वाहन गेल्यास रस्ता उकरू शकतो. कुणाला काही शंका असल्यास कामावर स्वत: उपस्थित राहावे व चुकीचे होत असल्यास निदर्शनास आणून द्यावे. ठेकेदाराला तशा सूचना दिल्या जातील.

**- डी.बी.पाटील, उपअभियंता, करकंब विभाग**

पटवर्धन कुरोली ते शेवते (ता. पंढरपूर) या रस्त्याचे दोन कोटी ३९ लाख रूपये खर्च करून डांबरीकरणाचे काम सध्या सुरू आहे. मात्र थोरबोले कन्स्ट्रक्शनकडून डांबर न टाकताच कोरडी खडी टाकून ती कचखडीने बुजवून रस्त्याचे काम निकृष्ठ करण्याचा सपाटा सुरू आहे. पुढे काम सुरू असतानाच मागे कोरडी खडी पुन्हा उकरत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. या रस्त्याचे निकृष्ठ काम थांबविण्याची मागणी दादासाहेब चव्हाण, माऊली जवळेकर यांनी केली आहे.

मागील अनेक वर्षांपासून हा रस्ता नादुरूस्त होता. त्यामुळे या रस्त्यावरून जाणेच नागरिकांनी थांबविले होते. वेळोवेळी मागणी, आंदोलने केल्यानंतर रस्त्याचे काम सुरू झाले. मात्र पावसाचे कारण पुढे करत थांबविले. रस्त्यावर टाकलेली खडी व मुरूमामुळे धुळीचे लोट उडत असताना ठेकेदार व बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून याकडे दुर्लक्ष केले जात होते. मात्र ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा देताच मागील १५ दिवसांपासून या रस्त्याचे काम सुरू झाले. मात्र ते आता ठेकेदाराकडून कशीबशी कोरडी खडी टाकून बुजवून निधी हडपण्याचा प्रकार समोर आला आहे. यावरून सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब चव्हाण व शेतकरी संघटनेचे माऊली जवळेकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना फोटो, व्हिडीओ टाकून ठिकठिकाणची कोरडी खडी उकरून दाखवूनही अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत. याबाबत पुढे काम सुरू असतानाच पाठीमागून अनेक ठिकाणी डांबर नसल्याने रस्ता पुन्हा जैसे थे होत असल्याचे चित्र आहे. रस्त्याचे काम अशा पद्धतीने झाल्यास हा रस्ता किमान वर्षभर तरी टिकेला का, याबाबत नागरिकांमधून शंका उपस्थित केली जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी सर्व कामाची चौकशी करून रस्ता पुन्हा नव्याने करावा, अशी मागणी नागरिक करीत आहेत. मात्र अधिकारी कार्यालयात या आपण बोलू म्हणून वेळ मारून नेत असल्याने नागरिकांची पंचाईत झाली आहे.

## खर्डीत सद्गुरु सीताराम महाराज पालखी सोहळा

**मंगळवेढा** : खर्डी येथील श्री सदगुरु सिताराम महाराज पालखी सोहळा ट्रस्ट यांचा खर्डी ते गाणगापूर पालखी सोहळयास शुक्रवार दि.२५ नोव्हेंबरपासून खर्डीहून प्रस्थान होत असून सदरचा पालखी सोहळा शनिवार दि.२६ नोव्हेंबर रोजी मंगळवेढयात येत असल्याची माहिती अरविंद नाडगौडा यांनी दिली. गेल्या ४५ वर्षापासून खर्डी ते गाणगापूर हा वारी सोहळा साजरा होत आहे.

रविवार दि.२७ रोजी माचणूर, ब्रम्हपुरी, सोमवार दि.२८ रोजी सोहाळे, मंगळवार दि.२९ रोजी कामती,बुधवारी दि.३० रोजी बाळे, गुरुवार १ डिसेंबर रोजी कुंभारी, शुक्रवार दि.२ डिसेंबर अक्कलकोट स्वामी मंदिर व गुरु मंदिर, शनिवार दि.३ डिसेंबर रोजी मैंदर्गी, रविवार दि.४ डिसेंबर रोजी रेवूर म्हेत्रे मळा, सोमवार दि.५ रोजी गाणगापूर मोरे महाराज मठ, मंगळवार दि.६ डिसेंबर रोजी संगम - अभिषेक व माधुकरी, बुधवार दि.७ रोजी दत्त जयंती सोहळा संपन्न होत आहे. शनिवारी मंगळवेढयात शनिवार पेठेतील मारुती मंदिर,श्री स्वामी समर्थ मंदिर आदी ठिकाणाहून ही पालखी श्री संत दामाजी मंदिरात मुक्कामास येत असून भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.



## शिवप्रेमींनी कोश्यारींचा निषेध व्यक्त करत प्रतिमेस मारले जोडे

सुराज्य/मोहोळ

शिवप्रेमींनी राज्यपाल भगतसिंग कोशियारीचा निषेध व्यक्त करत त्याच्या प्रतिमेस प्रतिमेस जोडे मारले. भगतसिंग कोशियारी यानी छ शिवाजी महाराज यांच्या बददल अवमानकारक शब्द वापले होते त्याचा निषध करण्यासाठी शिवप्रेमी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या जवळ जमा झाले. महाराजांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व त्यानंतर जोरदार घोषणाबाजी करित राज्यपाल भगतसिंग कोशियारी यांचा निषेध व्यक्त करण्यात आला.

यावेळी डॉ.प्रमोद पाटील म्हणाले, कीअखंड भारताचे दैवत शिवाजी महाराज याच्या बददल जी भाषा वापरली ती योग्य नाही भागतसिंग कोशियारी त्रिवेदी तसेच हरहर महादेव चित्रपटात तोड फोड केलेला इतिहास असेल या गोष्टीचा निषेध करण्यासाठी आम्ही शिवप्रेमी सर्व धर्म समभाव जपत इथे जमलो आहोत ही भाषा अवमानकारक व चिड येणारी आहे. शिवाजी महाराज हे आमचा श्वास प्राण सर्व काही आहेत आणि तुम्ही त्यांच्या बददल जर अवमानकारक भाषा वापरत असाल तर जशास तसे उत्तर दिले जाईल आता जोडे मारो आंदोलन केले आहे. उद्या हातात हत्यार घेवून दगड घेवून मागे लागायला कमी करणार नाही स्मृती भृष झालेल्या कोशीयारीला वेड्याच्या इस्पीतळात दाखल करा महाराष्ट्राच्या बाहेर फेकून दया अन्यथा उग्र आदोलन पुकारण्यात येईल असा इशारा डॉ प्रमोद पाटील यांनी दिला.

यावेळी म्हणाले याप्रसंगी अ‍ॅड.श्रीरंग लाळे, शाहुराजे देशमुख, सत्यवान देशमुख, संतोष गायकवाड, सोमनाथ पवार, चंद्रकात गोडसे, प्रमोद डोके यांच्यासह असंख्य शिवप्रेमी उपस्थित होते.

## महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी जेंडर संसाधन केंद्र या पथदर्शी प्रकल्पाची निर्मिती : सीईओ

**सोलापूर** : लिंग भाव समानता या विषयावरील विविध अभ्यास, पथदर्शी प्रकल्प आणि विशेष नावीन्यपूर्ण प्रकल्पामधून असे लक्षात आले आहे की महिलांच्या विविध सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी तालुकास्तरावर एक पूर्ण वेळ कार्य करणारी संस्था असणे आवश्यक आहे. त्यासाठीच जेंडर संसाधन केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. त्या केंद्राच्या माध्यमातून समुपदेशन करून स्त्री पुरुष समानता समाजात निर्माण करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

सांगोला तालुक्यातील सक्षम प्रभाग संघ, कडलास येथील अग्निपंख जेंडर संसाधन केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी बोलत होते. महाराष्ट्र राज्यातील ४ जेंडर संसाधन केंद्राचे उद्घाटन प्रातिनिधिक स्वरूपात ऑनलाइन पद्धतीने भारताच्या राष्ट्रपती महामहीम द्रोपदी मुर्मु यांच्या हस्ते करण्यात आले.



स्वामी म्हणाले की, सद्यस्थितीत महिला या पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसत आहेत. त्यामुळे यापुढे समाजात स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करणे आवश्यक असून सत्तेत जसा महिलांचा अर्धा वाटा आहे तसाच संसारात व व्यावहारिक जीवनात सुद्धा त्यांना अर्धा वाटा देण्याची गरज आहे. तसेच लिंग भाव समानता प्रस्थापित होणे आवश्यक आहे. तसेच या अग्निपंख जेंडर संसाधन केंद्राच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या कार्यक्रमाची रूपरेषा स्वामी यांनी सांगितली.

यावेळी प्रकल्प संचालक उमेशचंद्र कुलकर्णी, सहायक गटविकास अधिकारी विकास काळोखे, बालविकास प्रकल्प अधिकारी आरमा आतार, गटशिक्षण अधिकारी नाळे, जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, उपअभियंता नकाते,जिल्हा व्यवस्थापक संतोष डोंबे, मिनाक्षी मडीवली, अमोल गलांडे उपस्थित होते.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुका अभियान व्यवस्थापक कृनाल पाटील, अमोल सावंत, महंतविर घाडगे, सुधीर पिसे, महेश साठे, किशोर बिंडे, सचिन भोसले, अभिजित महादेवकर, राहूल माने, अजित वाघमारे, सुजित हेगडे, दिपक गाडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुषमा ढेबे यांनी केले तर आभार प्रदर्शन जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे यांनी केले.

# ‘हलाला’साठी नवे घटनापीठ

सुराज्य/नवी दिल्ली

**‘मुस्लीम धर्मातील ‘बहुपत्नीकत्व’ आणि ‘निकाह हलाला’ या प्रथांच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी पाच सदस्यांच्या नव्या घटनापीठाची स्थापना करणार असल्याचे जाहीर केले. वकील अश्विनी उपाध्याय यांनी या विषयावर जनहित याचिका दाखल केली होती. आधीच्या खंडपीठाचे दोन न्यायमूर्ती इंदिरा बॅनर्जी आणि हेमंत गुप्ता निवृत्त झाल्याने आता नव्या खंडपीठाची आवश्यकता असल्याचे उपाध्याय यांनी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. हिमा कोहली, न्या. जे. बी. पारडीवाला यांच्या खंडपीठाला निदर्शनास आणून दिले. त्यावर सरन्यायाधीशांनी आपण नवे घटनापीठ स्थापन करू,’ असे उत्तर दिले.**

## सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

३० ऑगस्ट रोजी न्या. इंदिरा बॅनर्जी, हेमंत गुप्ता, सूर्यकांत, एम. एम. सुंद्रेश आणि सुधांशू धुलिया या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, राष्ट्रीय महिला आयोग आणि राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग यांना जनहित याचिकांमध्ये पक्षकार केले होते आणि या याचिकांप्रकरणी त्यांचे उत्तर मागितले होते. त्यानंतर न्या. बॅनर्जी या २३ सप्टेंबर आणि न्या. गुप्ता १६ ऑक्टोबर रोजी निवृत्त झाले. त्यामुळे या घटनापीठाची पुनर्रचना



करण्याचे आदेश देण्यात आले आहे. बहुपत्नीकत्व आणि निकाह हलाला या दोन्ही प्रथांना बेकायदा आणि घटनाबाह्य म्हणून जाहीर करावे, अशी मागणी वकील अश्विनी उपाध्याय यांनी याचिकेद्वारे केली आहे. या याचिकांप्रकरणी जुलै २०१८ मध्ये घटनापीठ स्थापन करण्याचे आदेश दिले होते. या प्रकरणात फर्जना नावाच्या महिलेने दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला नोटीस बजावली होती आणि उपाध्याय यांच्या याचिकेची घटनापीठाकडून सुनावणी होणार असल्याचे स्पष्ट केले होते.

### या प्रथांना आहे आक्षेप

**बहुपत्नीकत्व :** पुरुषांना एकाच वेळी चार विवाह करण्याची परवानगी.

**निकाह हलाला :** घटस्फोटित मुस्लीम महिलेला तिच्या पतीशी पुनर्विवाह करण्यासाठी आधी दुसऱ्या पुरुषाशी लग्न करावे लागते, शारीरिक संबंध ठेवावे लागतात. त्यानंतर नवीन पतीपासून घटस्फोट घेतल्यानंतर पहिल्या पतीशी लग्न करता येते

# लाल कांद्याची एंट्री दमदार!

### पहिल्याच आठवड्यात गाठला सहा हजारांचा टप्पा

**सुराज्य/चांदवड : चांदवड बाजार समितीत गुरुवारी नवीन लाल कांद्याला पाच हजार रुपये प्रति क्विंटल असा भाव मिळाला. तालुक्यातील आसरखेडे येथील शेतकरी पवन पवार यांच्या नवीन लाल कांदा विक्रीस आणला होता. त्याला तब्बल ५१०० रुपये प्रति क्विंटल असा बाजारभाव मिळाला.**



अर्थात पुढील काही आठवड्यांमध्ये नवीन लाल कांद्याच्या आवकेत वाढ होणार आहे. त्यामुळे आवक वाढताच बाजारभाव कमी तर होणार नाही ना, अशी चिंता शेतकऱ्यांमध्ये आहे. लाल कांद्याची टिकवण क्षमता कमी असल्याने काढणीनंतर त्याची लगेच विक्री करावी लागते. त्यामुळे योग्य बाजारभाव मिळण्याच्या अपेक्षेने कांदा साठवून न ठेवता शेतकरी तो विक्रीस आणण्याची शक्यता आहे. चांदवड बाजारात लाल कांद्याची आवक सुरू झाली आहे. सर्वसाधारणपणे दिवाळीनंतर लाल कांद्याची आवक वाढते. परंतु यंदा अवकाळी पाऊस व ओल्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांना लाल कांद्याचे उत्पादन घेण्यास मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. मात्र त्याही परिस्थितीवर मात करून शेतकऱ्यांनी उशिरा का होईना उत्तम दर्जाचे कांद्याचे उत्पादन घेतले आहे. सद्यस्थितीत उन्हाळ कांद्याची नियमित आवक सुरू असून बाजारभावात सुधारणा झाली आहे.

# धरणावर जाऊन कुटुंबीयांना व्हॉईस मेसेज

## ‘मी जातेय’, आंतरराष्ट्रीय बास्केटबॉलपटूचा अंत

सुराज्य/मध्यप्रदेश

**मध्यप्रदेशातील बैतुल येथून एक अत्यंत वाईट बातमी समोर आली आहे. येथे एका १७ वर्षांची आंतरराष्ट्रीय बास्केटबॉल खेळाडू प्रार्थना साळवेने धरणात उडी घेत आत्महत्या केली आहे. काहीच दिवसांपूर्वी तिच्या भावाचा मृत्यू झाला होता. त्याने ती अत्यंत व्यथित झाली होती. हे दुःख ती सहन करु शकली नाही आणि ते आत्महत्येसारखा टोकाचे पाऊल घेतले.**

प्रार्थना साळवे भारतासाठी आंतरराष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धा खेळलेली आहे. तसेच, काहीच दिवसांपूर्वी तिचे लिगामेंट तुटले होते, त्यामुळे देखील ती अत्यंत निराशेत होती. त्यामुळेही तिने हा धक्कादायक निर्णय



घेतल्याचे सांगितले जात आहे.

या प्रकरणाची माहिती मिळताच एसडीआरएफच्या पथकाने घटनास्थळ गाठून गुरुवारी तिचा मृतदेह बाहेर काढला आणि पोलिसांच्या ताब्यात दिला. त्याचबरोबर पोलिसांनी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला आहे.

आगीत जळून भावाचा मृत्यू झाला, त्यानंतर तिचे लिगामेंट तुटले, त्यामुळे तिला तिच्या करिअरची चिंता सतावत होती. एकामागून एक घडलेल्या या दोन घटनांमुळे प्रार्थना पूर्णपणे निराश झाली होती. ती इतकी नैराश्यात गेली होती की तिने घरच्यांशी बोलणेही बंद केले होते.

बुधवारी रात्री ती घरातून स्कूटी घेऊन निघाली आणि थेट धरणावर पोहोचली. धरणाच्या काठावर उभी राहून तिने तिच्या कुटुंबीयांना व्हॉईस मेसेज पाठवला की ती जात आहे. कुटुंबीयांना काही कळेल त्यापूर्वीच तिने धरणात उडी घेतली. त्यानंतर कुटुंबीयांनी तात्काळ याची माहिती पोलिसांना दिली.

पोलिसांनी एसडीआरएफच्या मदतीने शोध मोहीम सुरू केली आणि दुसऱ्यादिवशी गुरुवारी तिचा मृतदेह धरणातून बाहेर काढण्यात आला.



# साईबाबांसाठी माफ १७५ कोटींचा आयकर

सुराज्य/शिर्डी

**आयकर विभागाने सन २०१५-१६ चे करनिर्धारण करताना श्री साईबाबा संस्थान हा धार्मिक ट्रस्ट नसून धर्मादाय ट्रस्ट गृहीत धरुन दक्षिणापेटीत आलेल्या दानावरती ३० टक्के आयकर आकारणी करुन १८३ कोटी रुपये कर भरणा नोटीस दिली होती.**

आयकर विभागाने मागील दोन वर्षात दक्षिणा पेटीतील दानावर आयकर आकारणी केली नव्हती. तथापि, सदर निर्णयास अनुसरुन मागील दोन वर्षाच्या दक्षिणा पेटीतील दानावर सुध्दा आयकर आकारणीचा निर्णय घेतला व संस्थानला आयकर आकारणीच्या नोटीसा दिल्या. संस्थानमार्फत उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायलयात रिट अर्ज दाखल करण्यात आले होते.

उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाने आयकर अपीलामध्ये कर निश्चित होईपर्यंत देय करास स्थगिती आदेश दिला होता. साई संस्थानमार्फत आयकर अपील दाखल करण्यात आले व आयकर विभागाने अंतीमतः श्री साईबाबा संस्थानला धार्मिक व धर्मदाय ट्रस्ट असल्याचे मान्य करुन दक्षिणापेटीतील दानावर आकारणी करण्यात आलेल्या करात सुट दिली. अशा प्रकारे मागील तीन वर्षात आकारणी करण्यात आलेल्या १७५ कोटी रुपये आयकरात साईबाबा संस्थानला सूट मिळाली आहे.


# पुण्यात गुंडांचा हैदोस, हवेत गोळीबार, बेदम मारहाण

सुराज्य/पुणे

**पुण्यात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. हत्या, बलात्कार यासह अनेक धक्कादायक घटना दररोज समोर येत आहेत. अशातच आता आणखी एका घटनेची भर पडली आहे. यात पुण्यातील उच्चभ्रू परिसर असलेल्या कोरेगाव पार्कमध्ये रात्री गोळीबाराची घटना घडली आहे.**

या घटनेत दोन गटात राडा झाला. या भांडणामध्ये चक्क हवेत गोळीबारही करण्यात आला. पुण्यातील या धक्कादायक घटनेचा व्हिडिओही समोर आला आहे. या प्रकरणी सहा आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मारहाणीची ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

या धक्कादायक घटनेचा व्हिडिओ समोर आला असून व्हिडिओमध्ये काही आरोपी तरुणाला



जबर मारहाण करत आहेत. सुरुवातीला ते त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण करतात. यानंतर यातील एक आरोपी बंदूक बाहेर काढतो आणि हवेत गोळीबार करतो. यानंतर सगळे मिळून तरुणाला बेदम मारहाण करतात.

विशेष बाब म्हणजे ही घटना रस्त्यावरच घडली असून आजूबाजूला अनेक वाहेन ये-जा करत असल्याचे दिसत आहे. गर्दीच्या ठिकाणीच ही धक्कादायक घटना घडली आहे.





# पाणी द्या, नाहीतर कर्नाटकमध्ये जाऊ

### जत तालुक्यातील ४० गावांचा सरकारला अल्टिमेटम

सुराज्य/सांगली

पाणीप्रश्नावरून सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील गावे कर्नाटकात येण्यास इच्छुक असल्याचा दावा कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी केला होता. त्यावरून आता जत तालुक्यातील ४० गावांनी महाराष्ट्र सरकारला अल्टिमेटम दिला आहे. महाराष्ट्र सरकारला शेवटची संधी आहे, पाणी द्या नाहीतर आम्ही कर्नाटकमध्ये जाऊ, असा इशारा जत तालुका पाणी कृती समितीने सरकारला दिला आहे.

# ५ कोटींचे बक्षिस असलेल्या आरोपीला दिल्लीत अटक

### २४ वर्षीय तरुणीची हत्या करुन पत्नी, मुलांना ऑस्ट्रेलियात सोडून पळ काढला

सुराज्य/नवी दिल्ली


**दिल्ली पोलिसांनी राजविंद्र सिंग या ३८ वर्षीय इसमाला अटक केली आहे. ऑस्ट्रेलियामधील एका तरुणीच्या हत्या प्रकरणामध्ये प्रमुख आरोपी असलेल्या राजविंद्रला पकडून देणाऱ्याला पाच कोटींचे इनाम ऑस्ट्रेलियामध्ये जाहीर करण्यात आले होते. ऑस्ट्रेलियातील हा वॉन्टेड आरोपी दिल्ली पोलिसांच्या हाती लागला आहे.**

क्विन्सलॅण्डच्या सुमद्रकिनाऱ्यावर २०१८ साली एका २४ वर्षीय तरुणीची हत्या केल्यानंतर राजविंद्र भारतात पळून आला होता. हत्या केल्यानंतर दोन दिवसांमध्येच राजविंद्र भारतात परतला होता. मागील चार वर्षांपासून ऑस्ट्रेलियन तपास यंत्रणा त्याचा शोध घेत होते अखेर दिल्ली पोलिसांच्या मदतीने त्याला पकडण्यात यश



आले आहे. तोह्या कॉर्डिंगले नावाच्या २४ वर्षीय तरुणीची राजविंद्रने २१ ऑक्टोबर २०१८ रोजी हत्या केली होती. क्विन्सलॅण्डमधील वँगेटी समुद्रकिनाऱ्यावर तोह्या तिच्या कुत्र्याबरोबर वॉकसाठी आलेली आलेली असताना राजविंद्रने तिच्यावर हल्ला केला. यातच तिचा मृत्यू झाला. त्यानंतर राजविंद्रने पुढील दोन दिवसांमध्ये ऑस्ट्रेलियातून पलायन केले. विशेष म्हणजे एका रुग्णालयामध्ये नर्स म्हणून काम करणाऱ्या राजविंद्रने आपली नोकरी, पत्नी आणि तीन मुलांना ऑस्ट्रेलियात सोडून पळ काढला.

# व्यक्तिमत्व हक्कांसाठी बच्चन यांची कोर्टात धाव





### न्यायालयाने दिला मोठा दिलासा!

सुराज्य/नवी दिल्ली

बॉलिवूडमध्ये बिग बी म्हणून ओळखले जाणारे अमिताभ बच्चन हे त्यांच्या शांत आणि संयमी स्वभावासाठी ओळखले जातात. ‘ऑन स्क्रीन अँग्री यंग मॅन’ची ओळख निर्माण करणारे अमिताभ बच्चन खऱ्या आयुष्यात तितकेच मृदूभाषी असल्याचे त्यांच्या अनेक कार्यक्रमांमधून आणि सामाजिक उपस्थितीमधून ठळकपणे समोर येतं. मात्र, आपल्या नावाचा, फोटोंचा किंवा आवाजाचा गैरवापर होत असल्याचे पाहून बिग बी चांगलेच संतप्त झाले आहेत. याविरोधात त्यांनी थेट दिल्ली उच्च न्यायालयात दाद मागितली. न्यायालयानंही त्यांची बाजू ऐकून यासंदर्भात अंतरिम आदेश देऊन बिग बींना दिलासा दिला आहे.

**नेमके काय प्रकरण आहे?**

अमिताभ बच्चन यांनी दिल्ली उच्च न्यायालयात पर्सनॅलिटी राईट्स अर्थात व्यक्तिमत्व हक्कांसाठी याचिका दाखल केली होती. ज्येष्ठ वकील हरीष साळवे हे अमिताभ बच्चन यांची बाजू न्यायालयात मांडत आहेत. न्यायमूर्ती नवीन चावला यांच्यासमोर या प्रकरणाची शुक्रवारी सुनावणी झाली. या सुनावणीदरम्यान अमिताभ बच्चन यांनी आपली भूमिका स्पष्टपणे न्यायालयासमोर ठेवल्यानंतर न्यायालयाने त्यांच्या बाजूने अंतरिम आदेश दिले आहेत.





# १५० कोटींच्या दंडानंतर ‘ॲपल’ला आणखी एक धक्का

सुराज्य/नवी दिल्ली

**‘ॲपल’ कंपनी सध्या पुन्हा एकदा वादाच्या केंद्रस्थानी असून यामागील कारण ठरत आहे आयफोनचा चार्जर. ‘ॲपल’ने आयफोनबरोबर चार्जर न देण्याचा निर्णय घेतल्याने कंपनी अडचणीत आली आहे. ब्राझीलमध्ये तर अनेक दुकानांमध्ये आयफोन जप्त करण्यात आल्याचे वृत्त आहे. चार्जरसारख्या महत्त्वाच्या ॲक्सेसरीजशिवाय फोनची विक्री करण्याला ब्राझील सरकारचा विरोध आहे. त्यामुळेच ब्राझील सरकारच्या निर्देशाने हे फोन जप्त करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.**

ब्राझील सरकारने केलेली ही आयफोन जप्तीच्या कारवाईचे आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. यापूर्वीही ‘ॲपल’ कंपनीला ब्राझील सरकारने चार्जरच्या मुद्द्यावरुनच दोनदा मोठ्या आर्थिक दंडांची शिक्षा करण्यात आली आहे.

नईन टू फाइव्ह मॅकने दिलेल्या वृत्तानुसार, सध्या ब्राझील सरकार देशातील शेकडो दुकानांमधील आयफोन जप्त करण्याची कारवाई करत आहे. या मोहिमेला ‘ऑपरेशन डिस्चार्ज’ असे नाव देण्यात आले आहे. मोबाईल विक्री करणाऱ्या दुकानांबरोबरच कंपनीच्या अधिकृत रिसेल स्टोअर्समधूनही सरकारच्या आदेशानुसार आयफोन ताब्यात घेतले जात आहे.

‘ॲपल’ने आयफोनची विक्री करताना त्याबरोबर चार्जर द्यावा यासंदर्भात देशामध्ये जारी करण्यात आलेल्या नवीन आदेशाचे पालन कंपनीकडून व्हावे या हेतूने हे आयफोन जप्त करण्यात आले आहेत. ‘ॲपल’ कंपनीने ब्राझीलमध्ये आयफोन १२ सिरीजच्या चार्जरची निर्यात थांबवली आहे.

# हा सगळा महाजन समितीचा घोळ : उदयनराजे भोसले

सुराज्य/मुंबई

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नावरून राज्यातील राजकिय वातावरण तापले असताना महाजन समितीने केलेल्या चुकांमुळे सीमाप्रश्न चिघळला असल्याची प्रतिक्रिया खासदार उदयनराजे भोसले यांनी दिली आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या ३८व्या पुण्यतिथीनिमित्त समाधीस्थळी अभिवादन केल्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.

सीमाप्रश्नासंदर्भात जी महाजन समिती नेमण्यात आली होती. त्यांनी केलेल्या चुकांमुळे आपल्याला त्रास होतो आहे. त्यांच्यामुळेच हा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे केंद्रशासनाने दोन्ही राज्याच्या प्रमुखांना बोलावून एक बैठक घ्यावी आणि त्यातून मार्ग काढावा, अशी प्रतिक्रिया उदयनराजे भोसले यांनी दिली आहे. दरम्यान, मला या बाबतीत सध्या काही बोलायचे नसून मी २८ नोव्हेंबर रोजी सविस्तर भूमिका मांडेन, असेही ते म्हणाले.

# ‘साडी-सलवारमध्ये महिला छान दिसतात’

सुराज्य/ठाणे

**महिला साडी नेसल्यावर, सलवार कुर्त्यावरही चांगल्या दिसतात आणि काही नाही घातले तरी चांगल्या दिसतात, असे वादग्रस्त वक्तव्य बाबा रामदेव यांनी केले आहे. या वक्तव्याचे तीव्र पडसाद उमटत आहेत.**

पतंजलि योगपीठ आणि मुंबई महिला पतंजलि योग समितीच्यावतीने शुक्रवारी योग विज्ञान शिबीर आणि महिला संमेलनाचे आयोजन शुक्रवारी ठाण्यातील हायलँड भागात करण्यात आले होते. त्यावेळी बाबा रामदेव हे महिलांशी संवाद साधत होते. त्यावेळी महिला साडी नेसल्यावर, सलवार कुर्त्यावरही चांगल्या दिसतात आणि काही नाही घातले तरी चांगल्या दिसतात, असे वादग्रस्त वक्तव्य बाबा रामदेव यांनी केले.

महत्त्वाचे म्हणजे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस उपस्थित असलेल्या कार्यक्रमात रामदेव बाबांनी हे वक्तव्य केले आहे. एवढेच नव्हे तर, अमृता फडणवीस १०० वर्षे तरुण राहतील, असेही ते म्हणाले. ठाण्यातील एका कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी खासदार श्रीकांत शिंदे उपस्थित होते.

अमृता फडणवीस यांना तरुण राहण्याची प्रबळ इच्छाशक्ती आहे. त्या शंभर वर्षांपर्यंत म्हाताऱ्या होणार नाहीत, त्या नेहमीच तोलून मापून खातात. खुश राहतात. जेंव्हा पाहावे तेंव्हा लहान मुलांप्रमाणे हसत असतात, असे रामदेव बाबा म्हणाले.

साडीमध्ये महिल्या चांगल्या दिसतात. सलवार सूटमध्येही चांगल्या दिसतात. माझ्या नजरेने पाहिले तर काही नाही घातले तरी चांगल्या दिसतात, असे वक्तव्य रामदेव बाबांनी केले आहे.



# व्हीआयपी रस्त्यावर असणार दिशादर्शक कमानी फलक

## महापालिकेने ७ ठिकाणची काढली निविदा : जाहिरातीच्या माध्यमातून उत्पन्नही मिळणार

सुराज्य/सोलापूर

महापालिकेच्या वतीने शहरातील सातरस्ता परिसर आणि संपूर्ण व्हीआयपी रस्त्यावर आता विविध ७ ठिकाणी दिशादर्शक कमानी फलक उभारण्यात येणार आहेत. या संदर्भातील निविदा प्रक्रिया ही राबविण्यास प्रारंभ करण्यात आला आहे.

प्रथम शहरातील होटगी रोड विमानतळ ते सात रस्ता, एम्प्लॉयमेंट चौक, डफरीन चौक महापालिका पार्क चौक, सरस्वती चौक ते पंढरपूर चौक या दरम्यानच्या व्हीआयपी रस्त्यावर सात दिशादर्शक फलकांचे होर्डिंग्स लावण्यात



येणार आहेत. यावर दिशा दर्शविणाऱ्या फलकासोबत विविध कंपन्या व इतरांच्या जाहिराती देखील करण्यात येणार आहे. हे सात दिशादर्शक होर्डिंग उभारण्यासाठी आणि पुढील उत्पन्नाच्या दृष्टिकोनातून याची निविदा काढण्याचे निर्देश देखील प्रशासनाच्या वतीने देण्यात आले आहेत. ही प्रक्रिया सुरू झाली असून लवकरच ते तयार होऊन महापालिकेला या माध्यमातून मोठे उत्पन्न मिळणार आहे. इंडियन रोडसकडून या संदर्भातील माहिती घेण्यात आली आहे. व्यावसायिक पद्धतीने दरवर्षी यासाठी किती भाडे मिळणार या संदर्भात माहितीही घेतली जात आहे.

### ■ निविदा प्रक्रिया राबविण्यास प्रारंभ : आयुक्त

महापालिकेची सध्याची आर्थिक स्थिती कमकुवत आहे. विविध स्त्रोत निर्माण करून महापालिका यापुढे उत्पन्न वाढविणार आहे. याच अनुषंगाने शहरातील विविध ठिकाणी होर्डिंगद्वारे उत्पन्न वाढीचा विषय पुढे आला आहे. या संदर्भातील निविदा प्रक्रिया ही राबविण्यास प्रारंभ करण्यात आल्याचे आयुक्त शितल तेली उगले यांनी सांगितले.

### ■ उड्डाण पुलाच्या अवॉर्ड पूर्णत्वासाठी अंतिम प्रक्रिया सुरू

शहरातील जुना पुना नाका ते पत्रकारभवन आणि जुना बोरामणी नाका ते पत्रकारभवन आशा दोन उड्डाणपुलांची प्रक्रिया सध्या सुरू आहे. या उड्डाणपूलांच्या अवॉर्ड पूर्णत्वासाठी अंतिम प्रक्रिया सुरू असून यानंतर लवकरच नोटिफिकेशन प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. यासाठी ४१ कोटींचे अवॉर्ड देखील भरण्यात आले आहे. या उड्डाणपुलाची प्रत्यक्ष सुरुवात लवकरच होईल असे आयुक्तांनी सांगितले. ५४ मीटर रस्त्या ची प्रक्रिया ही लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

### ■ गुंठेवारी बांधकामासाठी मोजणी आवश्यकच

राज्यातील इतर शहरांबरोबरच सोलापुरातील गुंठेवारीचा मोठा प्रश्न आहे. गुंठेवारी प्रकरणे निकाली काढण्यासाठी मोजणी प्रक्रिया बांधकाम परवानासाठी पार पाडावी लागेल. त्याशिवायकोणतीही प्रक्रिया पार पाडली जाणार नसल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

### ■ पनाश प्रकरणाची माहिती घेऊ

विजापूर रस्त्यावर १७ मजली पनाश टावर इमारत उभी करताना विकासक गॅलोर कंपनीने महापालिकेच्या केलेल्या फसवणूक व नुकसानीबाबत सविस्तर माहिती सुटीवरून आल्यावर घेऊ असे आयुक्तांनी सांगितले.

### ■ आयुक्त आठ दिवस रजेवर

महापालिका आयुक्त पदाचा पदभार घेतल्यानंतर शितल तेली- उगले या शिफ्टिंग व इतर बाबींसाठी आठ दिवसाची सुट्टी घेतली आहे. महापालिका आयुक्त पदाचा तात्पुरता पदभार त्या जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्याकडे सोपविल्या आहे.

# कीर्ती भराडियाचे सोलापुरात जंगी स्वागत

सुराज्य/सोलापूर

अरबी समुद्रात सलग सात तास २२ मिनिटे पोहून विश्वविक्रमाला गवसनी घातलेली कीर्ती नंदकिशोर भराडीया हिचा सोलापूरकरांनी जंगी स्वागत केले. कीर्ती भराडिया शुक्रवारी सकाळी सात वाजता सिद्धेश्वर एक्सप्रेसने सोलापूरच्या रेल्वे स्टेशनवर आगमन झाले स्टेशनवर नागरिकांनी गर्दी केली होती.



तो डब्यातून उतरताच गुलाब फुलांचा वर्षाव करत लोकांनी जय जयकार केला. हार व बुके देऊन तिचे स्वागत केले. तिच्या काकाने तिला खांद्यावर घेतले. खुल्या जीप मधून तिची मिरवणूक रेल्वे स्टेशन ते चार पुतळ्यापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. तिच्या बरोबर जीपमध्ये वडील नंदकिशोर, आई चित्रा, प्रशिक्षक श्रीकांत शेटे होते. पार्कवर आल्यानंतर पहिल्यांदा तिने अहिल्यादेवी होळकर चार हुतात्म्यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर कीर्तीचा नागरिकांनी सत्कार केला. माहेश्वरी संघटना, माहेश्वरी महिला मंडळ, युवक माहेश्वरी संघटना, स्पोर्ट्स पॅव्हिलियन, कोळी समाज, माहेश्वरी व्यापारी संघटनेने तिचा सत्कार केला. यावेळी दमाणी प्रशाला, माहेश स्कूल, श्राविका प्रशालेतील शिक्षकांसह माहेश्वरी समाजाचे किशोर राठी, ओमप्रकाश सोमाणी, गोविंद लाहोटी, राजगोपाल मणीयार, राजगोपाल मादनिया महावीर लाळे, स्पोर्ट्स पॅव्हिलियनचे प्रकाश भुतडा, जलतरण संघटनेचे अध्यक्ष सुदेश देशमुख, अनिल यरगल, संतोष कोल्हापुरे, सुहास चंछुरे, शामसुंदर भराडिया उपस्थित होते.

## व्याजाच्या पैशासाठी तरुणास मारहाण; अंगावर पेट्रोल फेकले

सोलापूर : तू माझ्याकडून व्याजाने घेतलेले आणखीन दोन हजार रुपये देणे आहे, असे म्हणत शिवीगाळ करून हाताने, लाथाबुक्क्यांनी मारहाण करत तरुणाच्या अंगावर पेट्रोल फेकल्याप्रकरणी नऊ जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना दि.२३ नोव्हेंबर रोजी रात्री सव्वादहा वाजण्याच्या सुमारास घोंगडे वस्ती येथे घडली. याप्रकरणी सोहेल जब्बार पठाण (वय-२५,रा.घोंगडे वस्ती भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अरबाज मुलाणी, इरफान इनामदार, आमिन इनामदार, फरहान इमानदार, युसुफ इनामदार, साजिद शेख (सर्व.रा.घोंगडे वस्ती) यांच्यासह दोन ते तीन अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. सोहेल पठाण हा एसटीएस चौक घोंगडे वस्ती येथे राहण्यास आहे. त्याने अरबाज मुलाणी याच्याकडून व्याजाने दोन हजार रुपये दिले होते. अरबाजने त्याला पैशाची मागणी केली आणि त्यानंतर त्याला हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. वरील संशयित आरोपी यांच्या नातेवाईकांना बोलवून त्याच्या अंगावर पेट्रोल फेकले. पुढील तपास सहायक फौजदार थोरात हे करीत आहेत.



## मराठा क्रांती मोर्चाने केला राज्यपालांचा निषेध

सोलापूर : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल अपशब्द वापरल्याबद्दल संभाजी महाराज चौक येथे राज्याचे राज्यपाल भगतसिं कोश्यारी व त्रिवेदी यांचा मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने त्यांच्या पोस्टवर मूत्रविसर्जन करून निषेध व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, दास शेळके, शिक्षण मंडळाचे माजी सभापती सुनील रसाळे, छत्रपती शिवाजी महाराज मुस्लिम ब्रिगेडचे फारुख शेख, शिरीष चव्हाण, अनिल मस्के, चक्रपाणी गज्जम, बाबुराव क्षिरसागर, विकास धायफुले आदी उपस्थित होते.



## कामटे यांना अनोख्या पद्धतीने अभिवादन

### स्पर्शरंग परिवाराने खडीच्या सहाय्याने रेखाटली चित्रकृती


सोलापूर : स्पर्शरंग परिवाराचे विपुल मिरजकर आणि सहकाऱ्यांनी हुतात्मा अशोक कामटे यांची चित्रकृती चक्क खडीच्या सहाय्याने साकारत हुतात्म्यांना २६/११ च्या पूर्वसंध्येला अनोख्या पद्धतीने अभिवादन केले आहे. पोलीस आयुक्तालयाच्या आवारात ही चित्रकृती त्यांनी साकारली आहे. २६ नोव्हेंबर २००८ साली दहशतवाद्यांच्या हल्ल्यात अशोक कामटेंसह अनेकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. त्यांच्या या बलिदानाचे स्मरण स्पर्शरंग परिवाराचे चित्रकार आणि विपुल मिरजकर आणि सहकाऱ्यांनी सोलापूरचे माजी पोलीस आयुक्त आणि या हल्ल्यात हुतात्मा झालेले अशोक कामटे यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी खडीच्या माध्यमातून ही चित्रकृती तयार केली आहे. यासाठी विपुल मिरजकर, नागेश खराडे, शुभम सब्बन, प्रमोद वडनाल, पवन मारता, सुरज गादास, सुजाता हिरेमठ, सुप्रिया बिराजदार, वैष्णवी कोडलहंगरगा, वैष्णवी चराटे, गीतेश्वरी गोली, आर्यन चव्हाण, वरद महिंद्रकर यांनी परिश्रम घेतले.१ ब्रास खडी वापरून तब्बल ३० तास राबून या कलाकारांनी ७० आय २५ फूटांची अत्यंत उत्कृष्ट कलाकृती साकारली आहे.

## गोमांस घेवून मुंबईकडे जाणारा कंटेनर पकडला

मोहोळ : अवैधरीत्या गोमांस घेऊन मुंबईकडे जाणारा कंटेनर मोहोळ पोलिसांनी पकडला असून यामध्ये २९ लाखांच्या गोमांसासह १३ लाखांचा कंटेनर मोहोळ पोलिसांनी पकडला असून चालकास ताब्यात घेण्यात आले आहे त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना शुक्रवारी पहाटे घडली. एक कंटेनर गोमांस घेऊन मुंबईला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. यानुसार पोलिसांनी लांबोटी जवळ असणाऱ्या सैनिकधाबा येथे सापळा लावला. अशोक लेलँड कंपनीचा कंटेनर त्या ठिकाणी आला. त्या कंटेनरची तपासणी केली असता त्यामध्ये मांस आढळून आले. त्याची अंदाजे किंमत २८ लाख ८० हजार रुपये आहे. कंटेनरसह पोलिसांनी एकूण ४२ लाख ५० हजारांचा माल जप्त केला. याबाबत मोहोळ पोलीस ठाण्यामध्येअ हमद अमजद खान पठाण (वय ४४ राहणार भिवंडी) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवले; गुन्हा दाखल

सोलापूर : कॉलेजला निघालेली १७ वर्षाची अल्पवयीन मुलगी दुपारी तीन पर्यंत कॉलेजमध्ये होती. मात्र दुपारनंतर ती घरात परतलीच नाही. ही घटना दि.१५ नोव्हेंबर रोजी घडली.त्यावेळी त्या पीडित मुलीच्या आईने व नातेवाईकांनी सर्वत्र पाहणी करून शोध घेतला असता, ती मिळून आली नाही. या प्रकरणी पीडित मुलीच्या आईने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.



२६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा होत आहे. यानिमित्त पार्क चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे.

## कारमधून सवा दोन लाखाची गोवा दारू जप्त

सोलापूर : राज्य उत्पादन शुल्क विभागाने २५ नोव्हेंबर रोजी मंगळवेढा तालुक्यात माचणूर गावाच्या हद्दीत एका कारमधून गोवा राज्य निर्मित ३० पेट्या विदेशी दारुचा साठा जप्त केला असून,कारवाईत वाहनासह ५ लाख ७६ हजार किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरिक्षक संदिप कदम यांना गोवा दारूच्या वाहतुकीबाबत मिळालेल्या बातमी नुसार त्यांनी २५ नोव्हेंबर शुक्रवारी पहाटे ६ वाजेच्या सुमारास सांगोला-मंगळवेढा रोडवरील माचणुर गावाच्या हद्दीत सापळा रचला असता त्यांना कार क्र.एम.एच.०२.सीएल.०८११ ही कार येत असल्याचे दिसले, त्यात गोवा राज्यात विक्रीसाठी असलेल्या विदेशी दारुचा साठा दिसून आला. वाहनचालक लक्ष्मीप्रसाद सखाराम मांजरेकर (रा.वेंगुर्ला ,जि.सिंधुदुर्ग) या इसमास जागीच ताब्यात घेऊन त्याचेविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ च्या कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## सिध्देश्वर कारखान्याचा गाळप बंद पाडल्यास आंदोलन

### दक्षिणमधील शेतकऱ्यांचा इशारा

सुराज्य/सोलापूर

सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचा गाळप हंगाम बंद ठेवण्याचे आदेश पुणे येथील राष्ट्रीय हरित लवादाने कारखान्यास दिले आहे. कारखान्याचा गाळप बंद केल्यास शेतकरी, सभासद,कामगार, कारखान्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणार आहे.

जर जिल्हा प्रशासनाने कारखाना बंद ठेवण्यास भाग पाडले, कारखान्यास हात लावाल तर शेतकरी रस्त्यावर उतरून मोठे आंदोलन छेडतील, प्रसंगी रक्ताचे पाट वाहतील असा इशारा पंचायत समितीचे माजी सभापती गुरूसिद्ध म्हेत्रे यांनी दिला.


भंडारकवठे गावातील चावडीत बैठक घेण्यात आली यावेळी माजी सभापती अप्पाराव कोरे, कारखान्याचे संचालक शिवानंद पाटील- कुडल विद्यासागर मुलगे, प्रमोद बिराजदार, बळीराजा शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अख्तरताज पाटील, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रवक्ते इकबाल मुजावर, दक्षिण सोलापूरचे अध्यक्ष बिळेणसिद्ध सुंटे सह बाजार समिती संचालक वसंत पाटील सोसायटी चेअरमन गोपाल जंगलगी युवा नेते प्रथमेश पाटील, व्हि.के. पाटील, निंबण्णा जंगलगी, बापुराव पाटील, गुरुबसय्या स्वामी, कुसुरचे माजी संचालक बाळासाहेब बिराजदार, सिद्धाराम व्हनमाने, विद्यासागर मुलगे, श्रीशैल पाटील, हुन्नुरसिध्द शेजाळे, अख्तरताज पाटील, मायप्पा जंगलगी, मल्लिकार्जुन धोत्रे, प्रकाश मुक्काणे, अशोक शिरवळ, सिद्धाराम बबलेश्वर, सिद्धाराम उटगे, चंद्राम अरकेरी, प्रशांत भरले, शशीकांत हुलवडे आदिसह अनेक शेतकरी बांधव उपस्थित होते.

# यशवंत सोसायटीत घरफोडी; रक्कमसह दागिने लंपास

सोलापूर : मुंबई येथे गावी गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने घराचा घराचा कडी कोंडा तोडून घरातील रोख रक्कम व सोन्या चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना दि.१५ ते २३ नोव्हेंबर दरम्यान श्रीराम नगर (यशवंत सोसायटी जवळ, कुमठा नाका) येथे घडली.याप्रकरणी तुळशीदास रामकृष्ण बेनगिरी (वय-६६,रा.श्रीराम नगर, यशवंत सोसायटी जवळ) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. बेनगिरी हे गावी गेल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने घराचा कडी कोंयडा तोडून घरात प्रवेश केला.त्यानंतर घरातील बेडरूम मधील कपाटामध्ये ठेवलेले सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम असा मिळून ९७ हजारांचा ऐवज चोरून नेला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास पोह.पाटील हे करीत आहेत.

### पोलिसांचा हातगाडी चालकांवर दंडूका

सोलापूर : सार्वजनिक रस्त्याच्या मध्ये हातगाडीवर भाजी विक्री करून येणाऱ्या-जाणाऱ्या




लोकांना अडथळा निर्माण केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.२४ नोव्हेंबर रोजी घडली. मंजुनाथ बसाप्पा कुप्परस्त (वय-४३, रा.बुधले गल्ली पश्चिम मंगळवार पेठ), किशोर मल्लिकार्जुन कांबळे (वय-३२, रा. जोडबसवण्णा चौक), लियाकत म.हनीफ कलबुर्गी (वय-४४, रा.शास्त्रीनगर), फिरोज राजअहमद मुलाणी (वय-४५, रा.अथर्व गार्डन, भवानी पेठ) व युसुफ मेहबुब पठाण (वय-४२,रा. घोंगडे वस्ती भवानी पेठ) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहे.

### महिला शिक्षिकेला जातीवाचक शिवीगाळ करून केला विनयभंग

सोलापूर : एका महिला शिक्षिकेला जातिवाचक शिवीगाळ करून तिचा विनयभंग केल्याबद्दल एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ३८ वर्षीय पीडित शिक्षकेने दिलेल्या फिर्यादीवरून संतोष महामने (रा.सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा नोंद झाला आहे. कुमठा नाका भागातील एका शाळेमध्ये मुख्याध्यापकाच्या कार्यालयात बैठकीदरम्यान संशयित आरोपी महामने हा पीडित शिक्षिकेला वारंवार टोमणे मारुन मानसिक त्रास देत असल्याची तक्रार केली. त्यावेळी महामने यांनी जातिवाचक शिवीगाळ करून तिचा विनयभंग केला तसेच मुख्याध्यापक, स्वामी, पाटील, बिडवे, गायकवाड यांना मारहाण व धक्काबुक्की केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.अधिक तपास सहायक पोलीस आयुक्त संतोष गायकवाड हे करीत आहेत.

# शहरातील प्रमुख रस्त्यांची कामे अर्धवटच

## — नागरिकांना होतोय त्रास; रस्ते तातडीने पूर्ण करण्याची मागणी —

सोलापूर : शहरात १७ रस्त्यांची कामे सुरू आहेत परंतु यापैकी काही प्रमुख रस्त्यांची कामे अर्धवटच असल्यामुळे नागरिक आणि दुचाकीस्वार, वाहनधारकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. काही ठिकाणी अर्धाच रस्ता केल्याने वाहन चालवताना कसरत करावी लागते आहे. पालिकेच्या या कारभारामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.



सोलापूर शहरात पूर्वीच खराब असलेल्या रस्त्यांची पावसामुळे आणखी दैना झालेली आहे. महापालिकेने ऐन पावसाळ्यामध्ये २४ कोटीच्या निधीमधून शहरातील १७ रस्त्यांची कामे हाती घेतली होती. काही लोएस्ट टेंडर भरलेल्या मक्तेदारांनाच या रस्त्याची कामे दिली. वर्क ऑर्डर दिल्यानंतर आणि पावसाळ्यात या रस्त्यांच्या कामांना सुरुवात झाली. पाऊस असल्यामुळे या रस्त्यांची कामे थांबविण्यात आली होती. परंतु आता पाऊस थांबून जवळपास महिन्याचा कालावधी लोटलेला असतानाही काही प्रमुख रस्त्यांची कामे अद्याप अर्धवटच आहेत. दरम्यान, सोलापूर महापालिकेचे तत्कालीन आयुक्त पी शिवशंकर यांनी रस्ते कामाची पाहणी करून कामे वेळेत पूर्ण न केल्याबद्दल काही मक्तेदारांना दररोज दंडाची कारवाई सुरू केली होती. आयुक्तांची बदली झाल्यानंतर देखील ही रस्त्यांची कामे सुरू झालेली नाहीत. नूतन पालिका आयुक्तांनी देखील रस्त्यांच्या कामाची पाहणी केली आणि रस्त्यांची काम लवकर संपविण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु अद्याप पार्क चौक ते नवीन पोलीस चौकी, होटगी रोड आदी काही प्रमुख रस्त्यांची कामे अद्याप अर्धवट आहेत. तातडीने रस्त्यांची कामे पूर्ण करण्याची मागणी होत आहे.